
आई तुझी आठवण येते
सुखद स्मृतीच्या कल्लोळांनी ..

..........

दिगू : भालचंद्र पेंढारकर

१६ डिसेंबर १९६७ । ४० पैसे

# माणूस



समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : एकोणतिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशाची वर्गणी : चाळीस रुपये
**संपादक**
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

**स. न.** **डिसेंबर, ३**

दौऱ्यावर असताना कोल्हापूर येथे २ डिसेंबरचा अंक घेतला. मुखपृष्ठ पाहून आनंद झाला, आणि विषादही वाटला. आनंद अशासाठी की, मुखपृष्ठावरील फोटोला आपण योग्य शीर्षक दिलेत. विषाद अशासाठी की, ज्यांचा गौरव आपण केलात, ते सेनापती आमच्यात नाहीत. संपूर्ण महाराष्ट्राचे स्वप्न साकार होईपर्यंत ते आमच्यात राहिले असते तर बरे झाले असते, परंतु 'कालाय तस्मै नम:' याशिवाय आपण काय म्हणणार? तसेच त्या अंकातील 'प्रतारणा' कथाही छान वाटली.

**रा. भि. कुलकर्णी**, मुंबई.

**स. न.** **डिसेंबर १,**

आपल्या साप्ताहिकाच्या दिवाळी अंकात व इतरही अंकात आपण ललित साहित्याला अग्रस्थान दिले आहे. वास्तविक त्यासाठी अनेक मासिके उपलब्ध आहेत, व बहुसंख्य वाचकवर्ग त्याचेच वाचन करत असतो. ललित साहित्याचे वाचक म्हणून वाचकांची आपल्याकडे धाव नाही. तेव्हा आपण नेहमीचाच मजकूर अधिक विस्ताराने दिल्यास बरे होईल.

**पु. म. वराडपांडे**, वर्धा.

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

# दिल्ली दरबार

अडीच-तीन वर्षांपूर्वी राजाजी आणि अण्णा दुराई यांचा तामीळनाडू हिंदीविरुद्ध खवळून उठला होता तर आता पं. नेहरू आणि लालबहादूर शास्त्री यांचा उत्तर प्रदेश इंग्रजीविरुद्ध पलिते पाजळून सैराट धावत सुटला आहे. देशापुढील वा राज्यापुढील इतर कोणताही प्रश्न या दोन्ही राज्यांना किती क: पदार्थ वाटतो हे भाषिक आंदोलन चटकन जोर पकडते यावरून दिसून येते. केंद्र सरकारच्या कामकाजाची भाषा कोणती असावी हा या वादातील कूट प्रश्न. आपल्या देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले त्या वेळी जीवनाच्या सर्व व्यवहारांवर इंग्रजी भाषेचे वर्चस्व होते. इंग्रजी ही समर्थ भाषा असली तरी अखेरीस ती परकीय आहे व म्हणून या नवोदित स्वतंत्र राष्ट्राने कालांतराने इंग्रजांचे आजचे वर्चस्व झुगारून देऊन त्याऐवजी सरकारी कामकाजाची भाषा म्हणून एखाद्या भारतीय भाषेची निवड केली पाहिजे हा विचार राष्ट्रीय स्वाभिमानाशी सुसंगतच होता. जास्तीत जास्त लोकांना समजणाऱ्या भाषेची या कामी निवड होणे क्रमप्राप्तच होते आणि म्हणून आपल्या घटनाकारांनी या फेरबदलासाठी आवश्यक असलेला पंधरा वर्षांचा कालावधी डोळ्यासमोर ठेवून २६ जानेवारी १९६५ पासून इंग्रजीऐवजी हिंदी ही केंद्र सरकारच्या कामकाजाची भाषा व्हावी अशी तरतूद करून ठेवली होती.

घटनाकारांनी सरकारी कामकाजाच्या महनीय पदावर हिंदीची निवड केली. यामागे उत्तर भारतीयांच्या किंवा उत्तर प्रदेशाच्या वर्चस्वाची (हिंदी भाषेचा साम्राज्यवाद हा इंग्रजी वृत्तपत्रात काम करणाऱ्या दाक्षिणात्य पत्रकारांनी रुळविलेला शब्दप्रयोग) भावना होती असा आज जो आरोप केला जातो त्यात काहीसे तथ्य आहे. स्वातंत्र्य आंदोलनास प्रारंभ झाला तेव्हापासून राष्ट्र भाषेचा विचार होत होता आणि तेव्हापासून हिंदी हीच भारताची राष्ट्रभाषा असावी हा विचार राजाजींसारख्या हिंदीच्या आजच्या कट्टर द्वेष्ट्याने त्या वेळी आनंदाने स्वीकारला होता; नव्हे मद्रास राज्यात हिंदी भाषेचा प्रसार व्हावा यासाठी दक्षिण भारत राष्ट्रभाषा प्रचारिणी सभेसारखी संस्था उभारण्यात पुढाकार घेत होता.

स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या देशात जे राष्ट्रीय ऐक्य निर्माण झाले होते ते स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अधिक दृढ होण्याऐवजी त्याला तडे जाऊ लागले आणि जातीयवादाप्रमाणेच प्रदेशवादहि भारतीय राजकारणात घुसला, नव्हे पद्धतशीर रीतीने

# पलित्यांचे राजकारण

त्याला खतपाणी घालण्यात आले. भाषिक तत्त्वांवर राज्यांची पुनर्रचना होणे ही एक क्रमप्राप्त घटना होती. परंतु भारतीय एकात्मतेची केवळ आपल्यालाच काळजी आहे असा दावा करणाऱ्या कांग्रेस-श्रेष्ठींनी या स्वाभाविक मागणीला विरोध सुरू करताच, या मागणीचा पाठपुरावा करण्याच्या निमित्ताने सर्वच राजकीय पक्षांनी प्रदेशवादाला कळत वा नकळत खतपाणी घातले. याचा परिणाम असा झाला, की इतर काही कारणांमुळे उत्तर भारताशी विरोध करणाऱ्या मद्रास राज्याने हिंदी-विरोधी भूमिका घेऊन आपल्या राज्यातील बहुजन समाजाला चिथावण्याचा प्रयत्न सुरू केला. पं. नेहरूंच्या राजवटीत उत्तर प्रदेशाला भारतीय राजकारणात वाढते महत्त्व प्राप्त झाले आणि उत्तर प्रदेशातील कार्यकर्ते उत्तर प्रदेश म्हणजे भारत, असे मानू लागले होते ही गोष्ट खोटी नसली, तरी उत्तरप्रदेशाला विरोध करण्याच्या नादात आपण हिंदी–विरोध करून राष्ट्रीय ऐक्यावर प्रहार करीत आहोत, याचे भान राजाजींसारख्यांनाही राहिले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही वर्षांच्या आतच मद्रास राज्यातील जातीयवादाने राजाजींना बाजूला भिरकावून दिले, परंतु राजाजींचा हिंदीविरोध मात्र आपल्या लोकप्रियतेसाठी राबविण्याचे ठरविले. रामस्वामी नायक्करांसारखा कार्यकर्ता तर 'आम्ही द्रविड असून उत्तरेकडच्या आर्यांचे वर्चस्व सहन करणार नाही" अशी गर्जना करून पाकिस्तान, शिखीस्तानसारखी स्वतंत्र द्राविडस्तानची मागणी करू लागला होता. आजचा द्रविड मुन्नेत्र कळघम हा पक्ष बरेचसे रामस्वामी नायक्करांच्या तत्त्वज्ञानाचा वारसा घेऊनच वावरत आहे. हा आरोप त्या पक्षाचे कार्यकर्ते अमान्य करतात हे मला माहीत आहे. परंतु हिंदी-विरोधाच्या नादात आकाशवाणीसारख्या संस्कृत शब्दांची हकालपट्टी करून, त्याजागी आज तरी रूढ नसलेला तामीळ शब्द वापरण्यामागे कोणते प्रयोजन आहे, असा प्रश्न मी मनोहरन यांच्यासारख्या कळघमच्या संसद-सदस्यास विचारला असताना 'हे थोडं जास्तच होतं हं' अशी त्याने खाजगी कबुली दिली. कळघम हा पक्ष आता सत्तारूढ असल्यामुळे थोडे जपून आणि जबाबदारीने बोलायला लागला असला, तरी गेल्या फेब्रुवारीपूर्वी निवडणुका जिंकण्यासाठी या पक्षाने तामीळ लोकमताला चेतविण्यासाठी कोणती भाषा वापरली होती, हे पाहिले तर 'आर्यांना विरोध करण्यासाठी आर्यांच्या हिंदीलाही विरोध' याच सुरात ही काही मंडळी त्या वेळी गात

होती ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. आजही मनोहरन यांच्यासारखा सदस्य म्हणतो की 'इंग्रजी ही आपण परकी भाषा मानण्याचेही कारण नाही. भारताच्या चौदा (की पंधरा ?) भाषांप्रमाणेच इंग्रजी ही देखील भारतीय भाषाच झाली आहे.

## पंडितजींचे अश्वासन

तामीळ भाषिकांच्या या हिंदी-विरोधाला तितक्याच प्रखर भाषेत उत्तर देण्यासाठी आता हिंदी सेना पुढे सरसावली आहे. (शिवसेनेला विरोध करता करता सेना हा शब्द मात्र आता विरोधकांनीही आपलासा केला आहे !) अलाहाबाद, वाराणसी, लखनौ, कानपूर, दिल्ली आदी शहरांत विद्यार्थ्यांकरवी हे आंदोलन हाताळले जात आहे. या आंदोलनाचे जनक कोण आहेत आणि त्यांना या आंदोलनामार्फत काय साधावयाचे आहे, या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी कॉंग्रेससारखा केंद्र सरकारची धुरा सांभाळणारा पक्ष या प्रश्नाबाबत खंबीर भूमिका का घेत नाही हा प्रश्न डोळ्यांपुढे येतो. १९६५ ही इंग्रजीच्या हकालपट्टीची मुदत ढकलण्यात आली पाहिजे ही गोष्ट १९६३ मध्येच पं. नेहरूंनी मान्य केली होती. कोणाच्याही इच्छेविरुद्ध हिंदी भाषा लादण्यात त्यांचा विरोध होता व म्हणून अहिंदी भाषिक राज्यांच्या सोयींसाठी आणखी काही वर्षे तरी इंग्रजी आणि हिंदी या दोन्ही भाषांचा केंद्र सरकारने वापर करावा अशी तडजोड त्यांनी सुचविली होती. परंतु ही तडजोड सुचविताना नेहरू जे एक वाक्य बोलले होते ते मात्र नेहरूंच्या या आश्वासनाला कायदेशीर स्वरूप द्या, अशी मागणी करणारे हिंदी-विरोधक सोयीस्कर रीतीने विसरले आहेत. त्या वेळी पंडितजी असे म्हणाले होते, की आज नाही तरी काही वर्षांनी हिंदी हीच भारताची राष्ट्रभाषा होणार आहे, झाली पाहिजे.'

पंडितजींचा वारसा सांगणारा कॉंग्रेस पक्ष दक्षिण भारतातील आपल्या उरल्यासुरल्या लोकप्रियतेला तडा जाऊ नये म्हणून हिंदीबाबत निर्धारी भूमिका स्वीकारण्याऐवजी नेहमीच्या प्रथेप्रमाणे हा प्रश्न पुढे ढकलण्याचीच कारवाई करीत आहे. जी भाषा उद्या भारताची राष्ट्रभाषा होणार आहे असे पंडितजींनी आग्रहपूर्वक सांगितले होते त्या भाषेत आपल्याला एकही वाक्य बोलता येत नाही, असे कामराज मोठ्या अभिमानाने सांगतात. कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून तामीळ भाषेत भाषण करण्याचा कामराजांना अधिकार आहे, हे मान्य करूनही पक्ष-प्रमुख, समोर उपस्थित असलेल्या श्रोत्यांना सहजासहजी समजणाऱ्या भाषेत बोलू शकत नाहीत ही वस्तुस्थिती, हिंदी ही उद्या राष्ट्रभाषेच्या स्थानावर आरूढ होणार आहे असे आश्वासन देणाऱ्या पक्षाला साजेशी ठरत नाही.

एकीकडे कळघमचा स्वतःच्या प्रादेशिक महत्त्वाकांक्षेसाठी प्रच्छन्न विरोध आणि दुसरीकडे कॉंग्रेस-नेत्यांचा या प्रश्नाच्या बाबतीत ठामपणे बोलण्यास नकार अशी परिस्थिती पाहिल्यानंतर कोणताही प्रश्न रस्त्यावर सोडविण्यासाठी उत्सुक असलेल्या

राजकीय पक्षांनी हिंदीचे भांडवल करावे हे ओघानेच येते. संयुक्त समाजवादी पक्ष या मोहिमेत आरंभापासून आघाडीवर. दुकानावर इंग्रजी पाट्यादेखील राहता कामा नयेत इतका या पक्षाचा आग्रह. परंतु संयुक्त सोशॅलिस्ट पार्टी या धेडगुजरी नावानेच आपला पक्ष वावरतो आहे, याची पक्षाच्या नेत्यांना खंत वाटू नये ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय? एक तर या पक्षांनी शुद्ध हिंदी नावे घ्यावीत किंवा सरळ इंग्रजी नांवे स्वीकारावीत! संयुक्त समाजवादी पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष ही नावे ठीक आहेत किंवा युनायटेड सोशॅलिस्ट पार्टी, पीपल्स सोशॅलिस्ट पार्टी (अर्थात पीपल्स सोशॅलिस्ट हा शब्दप्रयोग कम्युनिस्टांच्या पीपल्स डेमोक्रसी-सारखाच आहे) अशी चक्क साहेबी नावे स्वीकारावीत. परंतु स्वतःच्या नावात ज्या इंग्रजी शब्दाला भारतीय प्रतिशब्द रूढ आहेत ते शब्द बेधडक ठेवून चांदनी चौकातल्या रामलाल अँड सन्स या पाटीवरचा 'अँड सन्स' हा शब्दप्रयोगच केवळ ज्यांना खटकतो त्यांचे हिंदी प्रेम सच्चे आहे, की हिंदी प्रेमाच्या नावाखाली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना भडकावून आणि त्यांच्याकरवी एखादी टपालकचेरी जाळून 'हम भी कुछ कम नहीं' हे सिद्ध करायचे आहे, असे विचारावेसे वाटते.

सध्या असे झाले आहे, की कोणताही प्रश्न—मग तो लोकांच्या कितीही जिव्हाळ्याचा असो—त्याबाबत राजकीय डावपेच करीत बसल्याखेरीज आपल्या येथल्या कोणत्याच राजकीय पक्षास चैन पडत नाही. हिंदी भाषा राष्ट्रभाषा केव्हा होऊ शकेल? त्यासाठी कोणती उपाययोजना केली पाहिजे. अहिंदी भाषिकांना हिंदीची ओळख कशी करून देता येईल हे प्रश्न भाषा–पंडितांनी एकत्र येऊन सोडवावयाचे आहेत. परंतु आमची मजल चालली आहे ती भर लोकसभेत त्यासंबंधीचे विधेयक जाळण्यापर्यंत. याबाबत एकाद दुसऱ्या व्यक्तीला दोष देण्याचा माझा हेतू नाही. पण सरकारी कामकाजाच्या भाषेचा प्रश्न असो की पोलाद कारखाना कोठे उभारावयाचा हा प्रश्न असो, तो रस्त्यावर सोडविण्यासाठी कॉंग्रेसपासून कम्युनिस्टांपर्यंत साऱ्यांची उताविळी असते. तसे नसते तर सरकारी भाषादुरुस्ती विधेयकाला आपण प्राणपणाने विरोध करू अशी धमकी देणाऱ्या राजनारायण आणि बहादुरिया यांचे अनुयायी रस्त्यावर पलिते घेऊन उभे ठाकले नसते.

**सदाशिव पेठकर**



## ☐ नवा स्टॅंप

आसामची पुनर्रचना बाकी, करायलाच हवी ! फाळणीला हा किती सुंदर शब्द आहे ! मागे सिंध मुंबई प्रांतापासून वेगळा काढला. सांगणारे सांगत होतेच "अरबस्तानापासून सिंधूपर्यंत मुसलमानी जगताची सीमा झाली ती पुढे आता राजपुतान्याच्या दारापर्यंत तरी आणू नका !" त्यांचे कुणीच ऐकले नाही, तेच बरोबर झाले. सिंध वेगळा काढला. शस्त्रक्रियेनंतर थोडे बरे वाटतेच. कटकटी लगेच बंद झाल्या. पुढे तो प्रांतच पाकिस्तानात गेला, आणि कटकटी कायमच्या संपल्या. आसामचा प्रश्न बहुधा असाच केव्हातरी कायमचा सुटेल अशी आशा करू या !! नागांचे शिष्टमंडळ ऑक्टोबरात इंदिराजींना भेटायला आले. सगळे शिष्टमंडळच 'अंडरग्राऊंड' नागांचे. भूमिगत नागांशी बोलणी करायला इंदिराजींना त्या वेळी कुठे वेळ होता ! १ डिसेंबरपूर्वी बंगालचे डाव्या लालभाईंचे सरकार उडवायचे नक्की झालेले होते. तत्पूर्वी कोसिजीन साहेबांची परवानगी मागायची होती, अरब–इस्रायल वादात नासरला आपली गरज होती, अशी कितीतरी कामे होती. नागा शिष्टमंडळ आले ते २ ऑक्टोबरच्या मुहूर्तावर. लगेच राजघाटावर जाऊन शिष्टमंडळ गांधीजींचे दर्शन घेऊन आले. राष्ट्रपित्यांच्या दर्शनाने त्यांचा आपल्या मार्गावरील विश्वास दृढ झाला. इंदिरा जींना वाटले, मंडळी राजघाटावर गेली की त्यांना उपरती होईल. एकदा फाळणी केली. द्वेषाचा डोंब उसळला. गांधीजींची हत्या झाली. हा सगळा इतिहास आठवला की नागा लोक म्हणतील–'नको. आम्हांला नको स्वतंत्र नागालँड, नको फाळणी !' पण कसले काय त्यांचे आपले तेच तुणतुणे. मग मात्र इंदिराबाई रागावल्या. एकदम मॉस्कोला निघून गेल्या.

'नागा नॅशनल कौन्सिल'चे अध्यक्ष अनगामी झापू फिजो सध्या इंग्लंडमध्ये असतात. त्यांच्या कानांवर ही गोष्ट जाताच केंट परगण्यातील ब्रोमले येथील आपल्या निवासातून त्यांनी गर्जना केली–

"आम्हांला हवी असली वा नको असली तरी भारत व नागालोक यांच्यातील यादवी आता अटळ झाली आहे! आम्ही भारताकडे स्वातंत्र्य मागत आहोत असा आभास भारत सरकार निर्माण करीत आहे. हें कोण आम्हांला स्वातंत्र्य देणारे? नागालँड हा भारताचा भाग कधीच नव्हता. आम्ही भारतीय नाही. आमचा वंश भारतीय नाही. आमच्या देशावर राज्य करण्याचा भारताला अधिकार नाही. आक्रमकांविरुद्ध आम्ही लढत आहोत."

जून १९६० मध्ये भारतातून परागंदा झालेल्या या ६४ वर्षांच्या म्हाताऱ्याला अशी हिंसक भाषा वापरणे शोभते काय? आठ मुलांचा हा बाप गेल्या ११ वर्षांत आपल्या बायकोला भेटलेला नाही. ३५ वर्षांची मुलगी ॲडिनो फिजो ही त्याच्याजवळ लंडनमध्ये राहते. नेहरूंची जशी इंदिरा तशी फिजोची ही ॲडिनो. स्वतंत्र नागालँड करावे, आपण त्या स्वतंत्र राज्याचे प्रमुख व्हावे, आपल्या पश्चात ॲडिनोने राज्यकारभार करावा, अशी स्वप्ने हा म्हातारा पाहत आहे. परंतु हा डाव इंदिराजींच्या ओळखीचा आहे. आसामची पुनर्रचना करून काही काळ तरी नागालँड भारताशी संलग्न राखण्याची योजना त्यांनी आखली आहे.

दिल्लीत आलेले अंडरग्राऊंड नागांचे शिष्टमंडळ ऑक्टोबरात तणतणत निघून गेले. जरा घोटाळाच झाला त्या वेळी. शिष्टमंडळाचे नेते कुशाटो सुखाई यांनी इंदिराजींची दुसरी भेट मागितली. कारण ते आजारी पडल्याने ठरलेल्या वेळी ते इंदिराजींना भेटू शकले नाहीत. इंदिराजी मॉस्कोला जाण्याच्या कोण घाईत. इंदिराजींनी निरोप पाठवला–"आत्ता बाई मला मुळीच वेळ नाही!"

लगेच सरकारी चक्रे फिरली. नागा शिष्टमंडळाला 'हैद्राबाद हाऊस' हे सरकारी गेस्ट हाऊस खाली करा म्हणून सांगण्यात आले. शिष्टमंडळाने बांधाबांध केली, व जनपथ हॉटेलमध्ये रागारागाने मुक्काम हलवला.

इंदिराजींना कुणीतरी येऊन सांगितले–"सुखाई फार रागावले आहेत."

इंदिराजींना लगेच याचे मनस्वी वाईट वाटले. त्यांनी हाक मारली–" दिनेश, जा बाबा त्या कुशाटोला सांग... म्हणावे या भेटायला, आहे थोडा वेळ."

व्यापारमंत्री धांवत धांवत 'हैद्राबाद हाऊस'मध्ये गेले, तो तिथे कुणी नाही, रखवालदार म्हणाला–

"मंडळी जनपथ हॉटेलात गेली सकाळीच!"

दिनेशसिंग परतले. चिटणीस कौल मग समजूत काढायला जनपथ हॉटेलात गेले. परंतु बूंदसे गयी तो हौदसे नहीं आती–तसे झाले. कुशाटो सुखाई म्हणाले–

(पृष्ठ ६० वर)

# विचार वारे

। समीर ।

## अमेरिकेत धार्मिक वृत्तीची वाढ

गेली सतरा वर्षे हिंदू धर्माचे प्राध्यापक म्हणून काम करणारे अमेरिकेतील प्रिन्स्टन विश्वविद्यालयाचे वेदशास्त्रसंपन्न पंडित डॉ. अॅशबी हे साधू-संन्याशांशी व इतर भारतीय धार्मिक नत्यांशी चर्चा करण्यासाठी नुकतेच भारतात येऊन गेले. त्यांच्या मते अमेरिकन विद्यार्थ्यांना धर्मात—विशेषत: पौर्वात्य धर्मात—विशेष रस वाटू लागला आहे. अमेरिकेच्या बाहेरील जगाविषयी त्यांना एकूण जे कुतूहल वाटू लागले आहे त्याचाच हा एक भाग आहे. त्यांना इतर प्रदेशांचा इतिहास, संस्कृती आणि विचार-धन यांच्याबद्दल शक्य तेवढी माहिती करून घेण्याची इच्छा होऊ लागली आहे. ' वसुधैव कुटुंबकम् ' या भावनेचेच हे एक स्वल्प स्वरूप म्हणता येईल. प्रिन्स्टन विश्वविद्यालयातील ३००० विद्यार्थ्यांपैकी अर्ध्याहून अधिक विद्यार्थ्यांनी धर्मविषयक अभ्यासक्रम घेतला आहे. त्यामुळे या विश्वविद्यालयाच्या धर्म विभागात १४ प्राध्यापक नेमावे लागले आहेत. अमेरिकेतील इतर मोठ्या विश्वविद्यालयांतही अशीच परिस्थिती आहे. मात्र " सुरुवातीला धर्माचे शिक्षण घेणारे हे विद्यार्थी पुढे डॉक्टरी, इंजिनियरिंग, वकिली किंवा व्यवसाय-संचालन असल्या दिशांना जातात; फारच थोडेजण धर्माचा अभ्यास चालू ठेवतात.

## जपानी साहित्य

भारत - यात्रेला यणाऱ्या जपानी तज्ज्ञांची व विचारवंतांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, त्यात एक उल्लेखनीय व्यक्ती येऊन गेली, ती म्हणजे सुप्रसिद्ध लेखक युकियो मिशिमा. मिशिमा यांनी आतापर्यंत तेरा कादंबऱ्या व ३३ नाटके लिहिली असून ती सर्व जपानमध्ये ' बेस्ट—सेलर ' ठरली आहेत. या यशाचे रहस्य काय ? मिशिमांचे उत्तर : मी माझ्या कथांच्या व नाटकांच्या कथानकाकडे व रचनेकडे विशेष लक्ष पुरवितो. " सर्वसाधारणपणे जपानी साहित्यकार आपल्या कृती-

तला समर–प्रसंग अधिक रंगवीत नाहीत. शिवाय ते काही वेळा अशा अप्रत्यक्ष गोष्टीबद्दल लिहितात, की ज्यांना आपल्या आजच्या जगात खरो-खरीच काही स्थान नाही. मिशिमा यांनी "नो" या प्राचीन जपानी नाट्य प्रकाराचे पुनरुत्थान केले असून त्यांची ती नाटके तीन खंडांत रंगभूमीवर आली आहेत. ती म्हणतात, "ही नाटके जवळ जवळ औपचारिक शैलीची असतात व ती एका वेळी फार तर २०० प्रेक्षकां-पुढे करतात. गेली चार–पाच वर्षे ती नाटके मात्र पद्धतीने करण्यात आली आहेत व प्रेक्षकांना ती अजूनही आवडतात."


आधुनिक जपानच्या एका गोष्टीबद्दल मिशिमा यांना वाईट वाटते. "जपानी लोक निसर्ग-प्रेमाबद्दल प्रथमपासून प्रसिद्ध आहेत, पण आता ते निसर्गापासून अधिकाधिक दूर जाऊ लागले आहेत. स्त्रिया आपल्या मुलांना फुलपाखरे दाखविण्यासाठी ती टोकिओच्या डिपार्ट-मेंट स्टोअरमध्ये विकत घेतात! प्रग-तीचा हा असा परिणाम जपानी जनते-वर होत आहे."

## नवीन यूनोची आवश्यकता?

"जागतिक सुव्यवस्थेची समस्या" या विषयावर भारतीय विश्वविद्यालयां-तील विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी एक क्रमिक पुस्तक लिहायला मदत करण्या-साठी अमेरिकेतील एक कायदे-पंडित डॉ. सॉल मेंड्लोविझ् नुकतेच हिंदुस्था-नात येऊन गेले. त्यांच्यामतें गेल्या दहा वर्षांत आंतरराष्ट्रीय संबंधाच्या मूळ कल्पनेतच जमीन–अस्मानाचा फरक पडला आहे, व हा फरक मुख्यत: तांत्रिक प्रगतीमुळे पडला आहे. विज्ञानानी इतकी आघाडी मारली आहे, की मानव येत्या दहा–वीस वर्षांत चंद्रावर वसाहत स्थापन करण्याचा विचार करू लागला आहे. अंतर हा पूर्वीचा अडथळा आता जवळ जवळ नामशेष झाला आहे. "त्यामुळे आणखी वीस वर्षांनी आंतर-राष्ट्रीय संबंध कसे असावेत याचा विचार करणाऱ्या विचारवंतांना या सर्व नवीन गोष्टी जमेला धरण्याची आवश्यकता पटू लागली आहे." सर्व जगातील जबाबदार माणसे जोपर्यंत युद्ध आणि सामाजिक अन्याय नष्ट करण्याचा संघटित प्रयत्न करीत नाहीत – निदान त्यासाठी मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न करीत नाहीत – तोपर्यंत येत्या दहा वर्षांत खूप गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता कायम राहील."

सामाजिक न्याय स्थापन करणे, संघर्ष कमी करणे आणि एकूण सर्व लोकांचे जीवनमान सुधारणे या गोष्टी घडवून आणण्यासाठी एक नवीन प्रका-रच्या जागतिक संघटनेची आवश्यकता आहे यात शंका नाही. यूनोचे सध्या जे स्वरूप आहे त्या स्वरूपात या संघटनेला ही कामे करता येणे अशक्य आहे. स्वत:ची पोलीस संघटना आणि अगदी निराळ्या प्रकारची मतदान पद्धती असल्या खेरीज यूनोला ही कामे करता येणार नाहीत.

○



**पाखरांनी यांच्यापासून शरीर तोलणे शिकावे ! सशांनी यांचे चापल्य चोरावे !**

राजकारणात तत्त्वे हरवली की सर्कस उरते. वादात मुद्दे हरवले की फक्त आखाडा राहतो. आणि सर्कसमध्ये प्रत्येक लहानसहान गोष्टीतली थरार संपली तर राजकीय मेळाव्याइतकी ती कंटाळवाणी आणि रटाळ होते.

‘जेमिनी सर्कस’ सध्या मुंबईत आहे. मध्यंतरी आडवारी एकदा उत्साहाने ती पाहण्यासाठी वांद्र्याजवळच्या तंबूत गेलो आणि आरंभापासून तिचा राजकीय मेळावा झाला. का, सांगा. तिला गर्दी नव्हती. प्रचंड तंबू तुरळकच भरला होता. सर्कसमधलीच सगळी माणसे एकत्र केली असती तर ती कदाचित् प्रेक्षकांपेक्षा जास्त भरली असती ! गर्दीशिवाय नाटक काय, सर्कस काय, रंगणार नाहीत. तुडुंब भरलेले प्रेक्षागृह, रोधलेले हजारो श्वास, कडाडून पडणाऱ्या टाळ्या यात तर सगळी गंमत असते. जेमिनी सर्कसमध्ये तरी, काही तरी कमी आहे नाहीतर वय-परत्वे आपले तरी काही बिनसले आहे असे मानून अर्ध्या खेळातून मी उठून आलो.

पण पोरांच्या आग्रहाखातर परवाच्या रविवारी पुन्हा त्याच तंबूत शिरलो आणि काय विचारता ! आत पाऊल ठेवल्यापासून सर्वभर कसे चैतन्य वाटत होते. तंबू तुडुंब भरला होता, आणखी आणखी भरत होता. आवाजांचा मोठा थोरला घुमारा सिंहनादासारखा कानी पडत होता. रिंगणाला आधीच्या खेळाअखेरी लावलेली

**विजय तेंडुलकर**

## सर्कसवाले

पिंजरावजा उभी जाळी तशीच ठेवलेली होती आणि जाळीला लागून एकाला एक लावून चाकांचे तीन–चार पिंजरे. यांतून जंगलच्या बंदिवान रहिवाशांची चाहूल मात्र तेव्हाच आली. तंबूभर पसरलेला उग्र दर्प या मंडळींचाच हे तेव्हाच समजले आणि चक्क एक खोल हुंकारच सर्वभर उमटला. हा वनराजांचा निःश्वास ! सर्कस प्रत्यक्ष सुरू होण्याआतच माझी उत्कंठा चुळबुळू लागली. पहिली 'एंट्री' या रूबाबदार, धिप्पाड मंडळींचीच असणार हे ठरल्यासारखे होते. माझ्या पोराकडची छोटी दुर्बिण त्याच्याकडून हिस्कावून तिच्यावाटे एका पिंजऱ्यातले आडवळलेले धोकेबाज चटेरी पटेरी धूड वरखाली होतानाही मी जवळून समग्र पाहून घेतले.

— — — — — — — — —

## रातराणी

— — — — — — — — —

आणि बँड सुरू झाला. दिवे पेटले. रंगीन वेषातले वीस-पंचवीस गडी हारींनी रिंगणाकडे धावत आले. सर्व नजरा रिंगणाकडे वळल्या. आणि एक रूबाबदार काळा माणूस हाती चाबूक धरून रिंगणात उतरला. मागोमाग पिंजऱ्यातले एकेक सरदार रिंगणात सोडण्यात आले. एकेक चाबकाच्या धाकात पहाडी गर्जना करू लागले. कुणी आयाळ चाटू लागले, कुणी दात विचकून गुरगुरत राहिले. कुणाची शेपटी धोकेबाजपणे वळवळू लागली. चाबकाची कडाड ऐकू येऊ लागली. सिंह-वाघ बसण्या-उठण्याच्या कवायती करू लागले. तंबूच्या कोपऱ्याकोपऱ्यातून जशी वीज संचारली. माझ्या पोरांची आणि माझी मान एकदमच उंचावली ती केवळ दुखल्यानेच नंतर खाली झाली. वाघसिंहांच्या 'कॅक प्लॅटून' नंतर हत्तींची वरात सोंडा झुलवीत आली. बालवर्गातल्या पोरांसारख्या त्या एकाहून एक प्रचंड हत्तींच्या विस्कळीत कवायती पाहून हसून हसून पोट दुखले. त्यांचे पळणे, रांगा लावणे, स्टुलावर देवासारखे बसणे आणि शेवटी त्यातल्या एका शहाण्या हत्तीचे दोन पायांवर चालून दाखवणे, (एक पाय नाचव रे...मला माझ्या

लहानपणच्या त्या बाळ-गाण्याची आठवण झाली.) सारच फार फार गंमतीदार. मग हत्ती, उंट, घोडा (त्याच्या पाठीवर माकड !) आणि झेब्रा असा एक धावपळीचा उलट सुलट 'मार्च पास्ट' झाला. हत्ती झुलत पळत होता तर उंट अष्टांगांनी मोडत कसाबसा धावत होता, तर घोडा दुडकत होता आणि झेब्रा जणू अंगावरच्या चट्टयापट्टयांतून बाहेर पडण्यासाठीच या सर्वांमागून सुसाट सुटला होता. माझ्या पोराने कुतुहलाने या झेब्र्याबद्दल विचारले, तो नागला नाई होत ? बिचाऱ्या झेब्र्याला खरेच असे होण्याची चोरी ! जन्मस्थच बापड्याला सूट घालून आईने जगात पाठवले होते. मी आणि माझा पोरगा, दोघेही हळहळलो.

सलामीच्याच पात्रांनी खेळाला चारही पायांनी असा रंग भरल्यावर पुढे काय विचारता ? बिनहाडांची, पिसांसारखी हलकी आणि वर भरदार अद्‌भुत शरीरे वागवणाऱ्या एकेक कसरतबाजांनी क्षणोक्षणी आमचा दम नाकात आणला. त्यांची पोरेटोरे देखील काय हो चपळ ! पाखरांनी त्यांच्यापासून शरीर तोलणे शिकावे ! ससांनी त्यांचे चापल्य चोरावे, खारकुंड्यांनी त्यांना सुरदिशी उंच चढण्याचे गुपित विचारावे. वाटले की आयांच्या पोटातच बेटी हे सारे शिकली असावीत. एका स्मितवदना 'खुबसुरत बले'ने तर शरीराचे असे काही वेटोळे केले की, जिथे हात असायचे तिथे पाय आणि डोके असायचे तिथे हात दिसू लागले ! कमाल आहे ! बरे पुन्हा तितक्याच सहजपणे सारे काही पूर्ववत् ! आणि हे सारे स्मितवदन ठेवून ! हे तर फारच कठीण !

झालेच तर गोरिलाची फ्रीस्टाईल कुस्ती झाली. जाहिरातीतले गोरिला नामक भले उग्र धूड पाहून माझा उगाच गैरसमज झाला होता. रिंगणातल्या पिंजऱ्यात सोडला तो गोरिला नुकत्या मुंज झालेल्या सुदृढ बटूसारखा होता. तालमीत रोज लाल मातीत लोळत असावा तशा दमाने बेटा त्याच्या 'मास्तर'शी लुटूपुटूची कुस्ती खेळला ! मास्तर घामाने भिजला तरी चि. गोरीला एकदम तवाना आणि तरतरीत होता. तसेच मग त्याला त्याच्या मनाविरुद्ध रिंगणातून त्याच्या पिंजऱ्यात भरण्यात आले. बिचाऱ्या मास्तरची अब्रू बचावली !

पण सगळ्यात माझी आणि माझ्या पोराची दांडी उडाली ती वेगळ्याच खेळाला. बँडच्या तालावर पाणघोडे महाशय पाण्याने निथळत आपले थुलथुलीत थोरले पोट झुलवीत रिंगणात आले. जणू आंघोळीच्या टबातून तडक आले होते. काय लेकाच्याचा बेढब अवतार ! मग त्याच्या 'मास्तर'च्या 'छडी'च्या धाकावर याने 'आ' वासला तो पार जणू तंबूच्या छतापर्यंत वाटण्याइतका मोठ्ठा ! पण हेही तसे फार विलक्षण नव्हते. 'आ' करण्याला काय अक्कलहुशारी किंवा शरीर चापल्य लागते कपाळाचे ? डॉक्टरने चमचा घातला तरी 'आ' होतो. विलक्षण घडले ते पुढे. पाणघोडे महाराज मग रिंगणाच्या मध्यभागी जाऊन उभे राहिले आणि धप्पाक्कन खाली फतकल घालते झाले. काही केल्या ते उठेनात. 'मास्तर'—देखील तंग

आला. '. छडी ' पोटाखाली घालून या प्रचंड अडेलतट्टूला ढोसू लागला. त्यासरशी 'उठा म्हणता तर उठतो ' असेच जणू म्हणत हा जंगी प्राणी जो उठला –पुढचे माझ्या पोराच्या भाषेत सांगायचे तर आधी त्याने केली ' शी ' आणि मग ' सू ' नि गेले राजश्री. पोट दुलू दुलू झुलवीत परत ! सगळे रिंगण खराब झाले ! जणू सर्कसमध्ये एवढेच करण्यासाठी गाढवाला घेतले होते ! माझे पोर मला अचंब्याने विचारू लागले, छर्कशमध्ये हे पन कलतात ? आता त्याला काय सांगायचे कप्पाळ ! मनाशी म्हणालो, असले पाणघोडे सर्कसची सगळी परंपरा खराब करतात ! सर्कसवाले, जरा दुसरा पाणघोडा शोधा ! ...

पार मृत्युगोलातल्या फटफटीवरच्या जीवघेण्या सुरकांड्यांपर्यंत त्या दिवशी सर्व काही लांबले तरीही रंगले. खूप मजा आला !

एकाच गोष्टीबद्दल माझा मुलगा आणि माझ्यात गंभीर मतभेद झाला–विदूषक ! ही मंडळी मला भलतीच आवडतात, पण माझा पोरगा त्यांना चक्क घाबरतो ! मनचाहे डोक्यावरची ताठ, लांब शेंडी, उभी आणि आडवी करून शेवटी तिच्यावाटे पाण्याची धार सोडणारा बुटका विदुषक पाहून मला गुदगुल्या होत होत्या तर पोरगा मला घट्ट बिलगून म्हणत होता, आपण घली जाऊ या !

जाऊ द्या ! दोन पिढ्यात एवढे अंतर हे असायचेच ! □□

# देवकी

तिसऱ्या अंकात ' देवकी ' बिनसली ती न पेलणाऱ्या वेगाने. नाहीतरी आयुष्याचे काय, किंवा नाटकाचे काय, तिसरे अंक क्वचितच जमतात

यशस्वी नाटकाची वादग्रस्त पण विचारार्ह व्याख्या माझ्या एका नाट्यप्रेमी मित्रांनी एकदा केली होती. ते म्हणाले की, जे नाहीच ते घ्या आणि आहेच असे भासवा, की झाले आजचे यशस्वी नाटक. कौटुंबिक सौहार्द, त्याग, राष्ट्रप्रेम, सचोटी, विश्वास, तत्त्वनिष्ठा, नैतिक पावित्र्य, निष्ठा हे सारे आज शोधावे लागते. या लेबलांनी अन्य हिणकस मालच फार खपतो. म्हणून यातलेच काही घ्या आणि अस्सल स्वरूपात हे मुळी आहेच अशा आविर्भावाने रंगमंचावर मांडा–की प्रेक्षक झालाच तुमचा कैद !

ही व्याख्या खरी असेल तर 'मधुनाट्य'चे 'देवकी' हे नाटक यशस्वी झाले पाहिजे. पौराणिक मूल्ये या नाटकात सामाजिक वातावरणात गुंफली आहेत. आणि यासाठी कोकणची भूमी स्थल म्हणून योजली आहे. या नाटकात बाबीकाका हा कोकणच्या एका खेड्यातला रामचंद्रावतार. सर्वदृष्ट्या संशयातीत. उदार. लोकहिततत्पर, त्याची पत्नी काकीबाय ही सीता–मंदोदरी श्रेणीतली साध्वी. तितकी पतिपरायण. तितका गाढ विश्वास आपल्या पतीविषयी बाळगणारी. शिवाय कायम दुखणाईत तरीही प्रसन्न. बाबीकाका आत्मघाताच्या वेतापासून परावृत्त करून देवकी या तरुण, रूपवती भाविणीला घरात आणतो तेव्हा प्रथमदर्शनी काकीबाईच्या मनात एवढेदेखील किल्मिष येत नाही. उलट ती पुढे मनात आलेल्या संशयावर ताबा मिळवून स्वच्छ मनाने देवकीला पाठीशी घालते, तिचे रक्षण करते. तिच्यापासून एकच वचन घेते : आपल्या पश्चात ती बाबीकाकाला आणि घराला जपेल. देवकी-प्रकरणी बाबीकाकाला गावाने वाळीत टाकलेले असतानाच, काकीबाय देवाघरी जाते आणि देवकीची कसोटी लागते ती, बाबीकाका तिने आपल्याबरोबर बायकोसारखे राहण्याचा आग्रह धरतो तेव्हा. तेव्हा ती काकीबायला दिलेले घराच्या आणि घराच्या मालकाच्या भल्याचे वचन स्मरून एका तिसऱ्याच कुलीन, घरंदाज, सर्वसामान्य मुलीशी बाबीकाकाला लग्न लावण्यास भाग पाडते आणि आपल्या आयुष्यातली स्थैर्याची, प्रतिष्ठेची, सुखाची एक फार मोठी दुर्मिळ संधी खुषीने सोडते. या कथानकात गुंतलेली सारीच मूल्ये आजकाल विरळा आहेत. व्यवहार, लैंगिक आकर्षण, स्वार्थ, संशय यांपासून इतकी परावृत्त आणि इतक्या उच्च पातळीवर जगणारी माणसे कुठे खरोखरी दिसली तर त्यांना म्युझिअममध्ये मांडण्याचा मोह आपल्याला होईल. अशी माणसे आणि त्यांचे अलौकिक भाव-गर्भ, परस्पर-संबंध हेच 'देवकी'चे कथानक.

## शोकांतिका

वेगळ्या अर्थाने आणि वेगळ्या संदर्भांनी रामचंद्र–सीता–शबरीच्या विश्वातली ही गोष्ट मांडताना यात एक स्वामिनिष्ठ हनुमंतही लेखकाने निर्माण केला आहे. हा बाबीकाकाचा एकनिष्ठ कुळवाडी गडी रुमड्या. धन्यावर अपार आणि संशयातीत निष्ठा ठेवून हा त्याच्या वतीने व्यवहार–संशय–हेव्यादाव्यांच्या रावणसेनेशी सर्वस्वाने लढतो.

या उच्च स्तराला तुलना म्हणून एक अति व्यवहारी, क्षुद्रमनस्क, कृतघ्न, संशयी, रोकडे जगही रंगविण्याला लेखक विसरलेला नाही. हे या नाटकातले सामान्य माणसांचे जग.

या दोन स्तरांमधला विरोध आणि त्या पोटी उच्च स्तरावर होणारी वादळे, संघर्ष, मनस्ताप आणि या स्तरावरचे हृद्य मनोव्यापार म्हणजे 'देवकी' हे शोकात्म नाटक आहे.

या अलौकिक स्तराचे चित्रण करताना लेखक मधु मंगेश कर्णिकांनी या प्रकारच्या नाटकांसाठी एरवी आपल्याकडे वापरल्या जाणाऱ्या एकांगी, काहीशा आक्रस्ताळी, भडक नाटकी शैलीचा वापर करण्याऐवजी प्रामुख्याने काव्यात्मतेचा आश्रय घेतला आहे. याने या नाटकाचा सूर, टिपेचा न लागता सहज, सुसह्य आणि काही वेळा सुखद लागला आहे. या काव्यात्मतेलाही जागोजाग सुभाषितवजा कृत्रिम वाक्यांची बाधा होते ती व्यावसायिक यशाच्या दृष्टीने कदाचित नाटकाच्या जमेला गेली तरी काव्यात्मतेची सहजता तिने जागोजाग बिघडते. लागलेला सूर बिनसतो. ही काव्यात्मता सर्वसाधारणपणे भाव-गर्भ आहे, पण अव्वल काव्याची उ:त्स्फूर्त वाटणारी उत्कटता आणि तरलता ती क्वचितच घेते. त्या ऐवजी कित्येकदा सोप्या सांकेतिकतेची वाट तिने धरली आहे. तरीही अन्य नाटकांतील भडक भावचित्रणांच्या गर्दीत हे सौम्य, जरासे फिकेच आणि नेमके चित्रण सांकेतिक असूनही पहिले दोन अंक दर्शनीय, श्रवणीय वाटते.

या पहिल्या दोन अंकांत राहिलेला नाटकातील भावगर्भ आशयाला साजेसा संथपणा, तिसऱ्या अंकात सुटून घटनांची घोडदौड एरवी साध्या अशा या नाटकात सुरू होते आणि सुप्तासुप्त भावनांचे चित्रण दुय्यम ठरून उघड नाट्याचा, उशीरा सुचलेला हव्यास नाटकाचा कबजा घेतो, तो अखेरपर्यंत. याने असमाधान वाढते. केवळ अखेरच्याच अंकातील उघड नाट्याच्या आतषबाजीने विलक्षण, सनसनाटी असे काहीतरी पाहिल्याची ' अश्रू-फुले ' शैलीची नशाही लाभत नाही आणि पहिल्या दोन अंकांतले संथ भावसौंदर्यही बहुंशी निसटलेले असते.

कर्णिकांचे लेखन आणि मो. ग. रांगणेकरांचे दिग्दर्शन ही जोड अनुरूप जमली आहे. किंबहुना या नाटकाचा तोंडवळा गुणदोषांसकट रांगणेकरांच्या नाटकांशीच जुळणारा झाला आहे. भावसंबंधातली आवर्ते टाळून आणि गुंतागुंतीचे भाग वगळून, केवळ त्यातल्या सुखदु:खांची गंमत घेत प्रेक्षकांना रिझविणारे गंभीर, विनोदी, नेटके नाटक रांगणेकरांचे असे; तसे हे नाटक आहे. रांगणेकरांनी हे बसवले आहे हातखंडा वैशिष्ट्यांनी. नेपथ्यातला बारीकसारीक तपशील, त्या तपशिलाचा वापर, लहानमोठ्या व्यक्तिरेखांचे विविध लकबीतून अविष्कार, काहीशा फिक्याच नाट्याला 'अशा लकबी आणि अन्य युक्त्या, यांनी जागोजाग दिलेले उठाव यांनी नाटक वेधक झाले आहे. भूमिकांत इंदुमती पैंगणकरांची ' देवकी ' प्रेक्षणीय आहे, तेवढी श्रवणीय वाटली नाही. बाबीकाका म्हणून श्रीकांत मोघे रांगणेकरांच्या जुन्या नाटकातल्या रामचंद्र वर्द्यांच्या शिस्तशीर, कसलेल्या आणि रुबाबदार अभिनयाची आठवण देऊन गेले. काकीबाय झालेल्या सौ. कुसुम कुलकर्णी काकीबाय वाटल्या. शोकरस हे तर त्यांच्या अभिनयाचे मोठे बल. ते इथेही जाणवले. रुमडचागडी वठवला मधु कदम यांनी. हास्यरस हे त्यांच्या अभिनयाचे मोठे बल आहे याचा प्रत्यय त्यांनी घडवला. बाकी सर्व दिसले, वावरले, बोललेही पण जाणवले नाहीत.

दिग्दर्शक रांगणेकरांच्या गरजा भागविणारे वास्तवदर्शी नेपथ्य रघुवीर तळाशील-करांनी चित्रकाराच्या कसबाने मांडले होते; त्याने ते दृष्टीला सुखद वाटले.

कादंबरीवरून नाटक करताना दोन्ही बिघडल्याची उदाहरणे या आधीही होतीच; कादंबरी खरी करण्याच्या प्रयत्नांत की नाटक मातबर बनविण्याच्या यत्नात कोण जाणे, पण 'देवकी' चा तिसरा अंक न पेलणाऱ्या वेगाने आणि गर्दीने बनसला आहे.

तरीही हे खरे की 'देवकी' ला स्वतःचा असा एक सौम्य गोडवा आहेच. नाही तरी, आयुष्याचे काय, नाटकांचे काय, तिसरे अंक क्वचितच जमतात. ○

## संघटनेचे तत्त्वज्ञान

भारताच्या सर्व समस्यांचे मूळ काय ? देशी-परदेशी विचारवंतांनी या प्रश्नाची निरनिराळी उत्तरे दिली आहेत. पण परदेशांतला सामान्य तरुण इकडे येतो तेव्हा त्याला येथील परिस्थिती पाहून काय वाटते ? या प्रश्नाचे एक विचार-प्रवर्तक उत्तर सध्या भारतात असलेल्या 'नेदरलँडस् यूथ व्हॉलंटियर प्रोग्राम'च्या पाच तरुण मुला-मुलींनी दिल्लीत वार्ताहरांशी गप्पा मारताना दिले. ही मुलें व्यवसायाने नर्स असून अगरतला, त्रिपुरा आणि अलाहाबाद येथे 'स्कूल हेल्थ प्रोग्राम' आखण्यासाठी आली आहेत. त्यातली एक परिचारिका लेनी म्यूलेनबर्ग म्हणाली : नेदरलँडस्‌मधल्या प्रत्येक बालकाला ते काम करायला लागते तेव्हापासून संघटनेचे बाळकडू पाजण्यात येते, म्हणजे उद्दिष्ट व हातातली साधन-सामग्री यांची सांगड कशी घालावी हे शिकविण्यात येते. उलट संघटित आणि अनुशासनपूर्ण काम करण्याबद्दलची भारतीय लोकांची अनास्था ही येथली सर्वांत मोठी अडचण आहे."

विम झेलनपर्गेन हा तरुण म्हणाला, "मी मुलांच्या झुंडीच्या झुंडी एकाच नळाला तोंड लावून पाणी पितांना पाहिल्या. याहून वाईट म्हणजे काही ठिकाणी स्वच्छतेचा पोकळ देखावा होता. उदाहरणार्थ, एका शाळेत एक मिठाईवाला मिठाई विकत होता तो माशा आत जाऊ नयेत म्हणून मिठाईच्या थाळीवर झांकण ठेवीत होता खरा पण थाळीचा व झांकणाचा आकार यांत मेळ नव्हता, त्यामुळे माशा आत जायच्या त्या जातच होत्या. जेवढी थाळी तेवढेच झाकण हवे हे त्याला सांगण्याची कोणी तसदी घेतली नाही. हेच हिंदुस्थानातल्या मूलभूत असंघटितपणाचे प्रतीक आहे." मग या तरुण मंडळींचे इकडे खरे काम काय ? ते ज्या हिंदुस्थानी मंडळींच्या बरोबर काम करतील त्यांना "संघटनेचे तत्त्वज्ञान" शिकविणे. □

# अंकुर

उषा महिंद

निळंभोर आकाश काळया धुसरट ढगांत विरघळत होतं व ते खाली लवलं होतं. पाणी भरलेले मेघ थबथबून आले होते.

वारा सारखा भिगऱ्या घालीत होता. पाचोळया-पानांच्या चक्रातून तो, फुफाटा उडवीत फुगडी घालीत होता. टळटळीत दुपार टळली होती. हवेतल्या उष्मेची चढण रंग देत होती.

नारू परटाची बायको रत्ना अंग अवघडून बसली होती. ओढयाच्या पाण्यातल्या एका खडकावर बसून ती विचार करीत होती. ती क्षणात पाखाळया घालणाऱ्या वाऱ्याचा विचार करीत होती.

सकाळपासून पावसाची झिरमिरी चालूच होती. एखादी दुसरी येत होती आणि वाळवणावर चार थेंब टाकून पसार होत होती. नाही नाही म्हणत काळया ढगाची ढेप आभाळातनं फुटत होती.

आभाळाकडं बघता बघता रत्ना धुणं धूत होती. अजुनी न वाळलेल्या लाल-हिरव्या, रंगीबेरंगी कपडयांच्या त्या पट्टयांच्या ओळीकडे ती पाहत होती. मानेवर बांधलेला केशसंभार सुटून गोऱ्या पाठीशी चाळा करीत होता.

रोजच लोकांघरची धुणी अपूर्वाईनं धुणारी रत्ना आज अगदी अवघडल्यासारखी झाली होती. मारावल्यासारखी झाली होती.

क्षणाक्षणाला तिची ही अवस्था बदलत होती. तरी ती गप्प होती. वाकून धुवायला येईना तेव्हा ती बसून धुणं बडवू लागली. पण मध्यच तहान लागली तशी तिनं हिरवं-पिवळं ओढयाचं पाणी ढवळून ओंजळीत घेऊन एक चूळ टाकली. एक हात कंबरेवर ठेवून ती बाळुती बडवीत होती. मग तशा अवस्थेत तिच्या मनात

*" लवकर ये बाबा. तुझं गोंडस रूप कधी पाहीन असं होतंय रे. येशील नं ? " आणि रत्नाला वाटलं पोटातल्या बाळानं हुंकार दिलाय.*

अस्फुट चांदणं फुललं. मग तिनं अंतर्मनी बाळराजसाला साद घातली, 'किती दम-वितोस रे बाबा,' तिचं हृदय गलबललं आणि बोललं, 'लवकर ये बाबा, तुझं गोंडस रूप कधी पाहीन असं होतंय रे' 'येशील ?' आणि मग तिला वाटलं बाळानं 'कार दिलाय !'

केलेल्या दानाचं हौसेनं वाढविलेलं ते गोड ओझं होतं. मग तिच्या नजरेसमोर आपले मागचे दिवस, नव्हे कित्येक वर्षे येऊन जात.

अंगानं भरलेल्या, नाजूक कायेच्या आणि टपोऱ्या डोळयांच्या रत्नाला पाहून नारू देहभान हरखला होता. त्याचा स्वभावही तिढयाचा नव्हता. निदान रत्नाशी तरी तो चांगल्याच प्रकारे वागत होता.

पण दिवस पुढे गेले आणि दोघांच्या इच्छेचे गोड फळ कधीच अंकुरून आलं नाही.

अंगातला उत्साहच विरजत गेला तशी नवी नव्हाळीसुद्धा वाळून जाऊ लागली. वेलीला फूल होतं पण शेतच नव्हतं, आपल्या पदरात परमेश्वराने एखादं तरी फळ टाकावं म्हणून ती पदर पसरून होती, पण होतं तसंच होतं.

लग्न होऊन सहा वर्षे संपून गेली होती; पण आशेला काहीच ठिकाणा नव्हता. आणखी अशीच चार वर्षे वाट पाहण्यात गेली. पण होतं तसंच होतं. आता तिच्या वयाला तिसावर दोन वर्षे झाली होती. पण नवऱ्याची माया तिळभरही कमी झाली नव्हती. तिच्यावर तो अत्यंत प्रेम करीत होता. रात्री त्याच्या प्रेमळ मिठीत असूनही तिला आपल्याला कडचात वेढल्यासारखं व्हायचं. हो खरंच ! हा दोष कोणाचा होता ? देवाचा ? त्याचा का तिचा ? पण ह्याचं उत्तर तिचं तिलाच सापडत नव्हतं. सुखाच्या सावलीत असूनही भुतानं झपाटल्यासारखी होत होती. मग नाही नाही ते विचार तिच्या डोक्यात थैमान घालीत होते. ती आपल्या मनाशी विचारी, 'असंच किती दिवस चालेल ?' आणि तिनं एक दिवस मनाचा हिय्या करून नवऱ्याला विनवलं, 'मुलांसाठी दुसरी करा.' पण तिचं हे विनवणं नवऱ्यानं ऐकलं नाही.

दिवस पुढं पुढं जातच होते. आपल्या ओटयात फळ नाही म्हणून ती निराश होत होती. काळीज आतून करकर कापलं जात होतं. आताशी ती एकदम अबोल झाली होती. आयाबायांची घरांतली, कडेवरची, रांगलेली, पाळण्यांतली बाळं बघितली की तिचा जीव आसुसत होता.

अन् एके दिवशी तिला समजलं की, आपल्यावर जिवाची कुर्बानी करणारा नवरा दुसरीवर तितकंच प्रेम करतोय. तिला वाटलं होतंय ते बऱ्यासाठीच ! नाहीतर त्यानं तरी कुठवर असं थांबावं !

ती लोकांची धुणी बडवीतच होती. नवी पातळं जुनी होऊन तिच्याच हातून जात होती आणि बाळाची वाळुती होऊन तिच्यापुढे येत होती.



**फूल हातात धरण्यापूर्वीच त्याच्या पाकळ्या पडत होत्या.**

दिवसभर ती घुणी बडविण्याच्या कामात रोवली होती. नारू— रत्नाचा नवरा— विड्याकाडीच्या दुकानात कामाला होता. त्याच्या मालकानं विडीकाडीवर, नजर न ठरू देणारी घरं बांधली होती. पण हा आपला मख्ख होता. अलीकडे तर त्याला नाही ते नाद लागले होते. वेळच्या वेळी तो घरी येत नव्हता — अन् आला तर वेड्या-सारखी बडबड करायचा. मग तिला हे असह्य व्हायचं. पण ती केर सारून पाणी भरल्यासारखी करायची मग अगदी सकाळी सकाळी चार भाकरी बांधून ती स्वत: त्याला पोहोचती करायची.

वाळूतून झरा फुटावा तशी तिची अंगकांती टवटवीत दिसत होती. आपली तकाकणारी अंगकांती आरशात पाहत बसायची. दिवसभराच्या रगाड्यानं तिचं अंग दुमडून निघायचं. पण पोटातल्या बाळाची चुळबुळ तिला सुखावीत होती. भर-तीची लाट मागं मागं सरकत गेली तशी रत्नाला हे अधिक अवघड वाटू लागलं. पोटासाठी काम करावं लागत होतं. काय करायचं तिनं तरी ? पोटाचा जाळ विझवायचा होता ना ?

मग ती डोळं टिपून कामाला लागत होती.

पाऊस येणार अशी दाट चिन्हं दिसत होती. रत्ना राहिलेले दोन-तीन पिळे धूत होती. तिच्या टपोऱ्या-गहिऱ्या डोळ्यांखाली काळीमोर वर्तुळं रिंगण मारल्यासारखी

दिसत होती. एक हात कंबरेवर ठेवून ती बाळुती बडवीत होती. कसंतरी धुणं पाण्यातनं बुचकाळून खडकावर पसरत होती.

हाशहुश करीत तिनं ते धुण्याचं रेताड संपविलं. एकाएकी कंबरेपासनं पायाकडं वेदना वळवळू लागल्या. दिलेल्या दानाची हौसेनं घेतलेली ती अपूर्वाई होती.

उसासा टाकीत ती धोंड्यावर टेकली पण धोंडा रुतू लागला. तशी ती पाण्या-शेजारच्या हिरवळीवर बसली. फडक्यातली भाकरी तिला सोडाविशीच वाटेना. मग तिनं कंबरेच्या कनवटीतली मिश्रीची पुडी काढून तळहातावर घेतली आणि घसा-घसा घासायला सुरुवात केली. दांतावरून हाताची बोटे फिरेनाशी झाली तशी तिनं ओढ्यातलं पाणी ओंजळीत घेऊन तोंडातनं फिरवलं.

कळा जास्तच निघू लागल्या. भोवळ आल्यासारखं तिला वाटू लागलं. सारं जग स्वत:भोवती फिरतंय असं वाटू लागलं आणि कसंबसं तिनं स्वत:ला सावरलं.

धुण्याची गठुळी सर्वांच्या घरांत पोहोचती करून ती घरात आली. अचानक ती मट्टदिशी खालीच बसली. साऱ्या देहाचा गोळा करून ती कलंडली.

वेदना वाढू लागल्या. निसर्गाचं लेणं चोहोबाजूनं साकारून येतंय असं तिला वाटू लागलं. कळा उरातून फुटून येत होत्या.

आणि कळा येतच होत्या. गाठ मोकळी होताच पीळ नाहीसा व्हावा त्याप्रमाणं होत होतं.

असेच दिवस आले आणि गेले. जेव्हा पदरी मूल नव्हतं तेव्हा ती नाराज होती; पण अचानक कुशीत बाळ वाढू लागलं आणि तिच्या आशा मोहरू लागल्या. बुरुजाला सुरुंग लागून तो बेचिराख व्हावा त्याप्रमाणं मूल पोटातनं येताच तिला दु:ख देऊन जात होतं. एकही जगत नव्हतं.

वेळ गेली होती, आशा मरत नव्हती.

गेले कित्येक महिने – वर्षे – ती प्रत्येक वेळेला शर्यतीसारखी बक्षिसाच्या पाठीमागे धावली होती. पण सर्व व्यर्थ. फळ झाडाला लागावं अन् अचानक खाली पडून फुटून जावं तसं तिचं होत होतं. प्रत्येक खेपेस तिच्या नव्या आशा नव्या उमेदीने साका-रून येत होत्या. आकाशात मेघ डवरून यावेत, माती प्रस्फुटित व्हावी अन् मेघांचा फुगा फटदिशी फुटावा तसंच तिचं होत होतं.

तिनं दान सर्वस्वानं केलं होतं. फूल हातांत वरण्यापूर्वीच त्याच्या पाकळ्या गळून पडत होत्या.

तहान लागली होती पण पाणी दिसत नव्हतं. मार्ग हवा होता पण कोणी तो दाखवीत नव्हतं. तिचं तिनंच हे दु:ख सहन केलं होतं. तिला वाटायचं वेलीला बहरण्यापेक्षा फूल येण्यातच तिचं सार्थक असतं. नव्हे तर तिचा खरा आनंद तोच ! आपल्या इवल्याशा फुलाला घेऊन ती सूर्याला सामोरी असते. तिचा बहर फुललेला असतो. – असंच किती तरी तिच्या मनात येत होतं.

अंग आखडून ती विचारात पडली होती. थांबून–थांबून जिवाची घालमेल वाढतच होती.

मग तिचा एकाकीपणा स्वतःलाच बोचकारू लागला. कोणीतरी यावं, विचारावं, काय होतंय. चहा-कॉफी पाहिजे ? सगळे कसे कासवं आहेत. सुखाच्या वेळेला कावळ्याप्रमाणे टोच्या मारून खातील आणि दुःखाच्या वेळेस कासवाप्रमाणे पाय पोटात घेतील. पळ काढतील. सगळे एकजात स्वार्थी ! अप्पलपोटी !! स्वार्थाचा घोट गिळेपर्यंत सोबत करतील. गोड बोलतील आणि पुन्हा पायामध्ये शेपूट घालून पळ काढतील.

पुन्हा पुन्हा गळून पडलेल्या फुलांची माळ तिला डोळ्यांसमोर दिसत होती. आणि तरीही ती प्रतीक्षा करीतच होती.

मिटल्या डोळ्यांपुढे देवाची मूर्ती ती आठवत होती. तिची प्रार्थना चालूच होती.

'देवा, माझी भूक शांत कर, माझा पदर उजव, एखादं तरी फळ टाक रे.'

आसावलेल्या नजरेनं ती देवाची आळवणी करीत होती. असं हे प्रत्येक वेळेला होत होतं. प्रतीक्षेच्या झाडाला कल्पनेची लाख-लाख फुलं उमलत होती. तिच्या आशा तितक्याच वेगानं फुलायच्या.

दुष्ट दैवाचं हे नाटक तिनं उघड्या डोळ्यानं मनावर कोरलं होतं.

विचार करता करता रत्नाला आपला जीव नकोसा झाला होता. कळांची शीग पार डोईवर चढली होती. तिला वाटलं आपण दिवस तर मोजायला चुकलो नाही ना ? चटकन तिनं आपली बोटं उघडून मोजायला सुरुवात केली.

होय ! तेच, त्याच त्या कळा !! तशी ती चमकली. बाळ, आपलं, माझं बाळ येऊ का म्हणून विचारीत आहे असं तिला वाटू लागलं. 'येऊ का ऽ ग घलात' असे बोबडे बोल तिच्या कानाशी हितगुज करू लागले.

कधी ती निराश होत होती. निराशेपोटी ती आशेची बोंडं चघळीत होती. 'देव दयाळू आहे' असं तिनं पुराणात ऐकलं होतं.

अलीकडे नवरा घरात धुसफुसत होता. वादानं तिरमिरीवर येत होता. कधी कधी बोलता बोलताच गप्प होत होता. त्याला काय होतंय हे तिला त्यानं न बोलताच कळत होतं.

ती अगदी निष्क्रीय होती.

मागचे सोनेरी दिवस तिला आठवत होते.

वाट पाहाण्यात विलक्षण समाधान आहे. चातक एका थेंबासाठी मेघाचीच वाट पाहतो. उन्हाचे तडाखे खात असलेली जमीन पावसाची अपेक्षा करते. स्वाती येऊन जलाचा बिंदू शिपल्यातला मोती बनतो.

आताही ह्या वेळेस कुठंतरी फास लावून घ्यावा अन् कायमचं या जाचातून सुटावं असं तिचं मन म्हणत होतं. सगळं असह्य होत होतं. चाहुलीचा साद घेण्या-

साठी तिनं आतापर्यंत अगदी आत कान लावला. मनातल्या मनात ती सुखावली. पण एक क्षणभरच !

ती तशीच फरफटत एका लाकडी पेटीपाशी गेली अन् त्यातली हाताला लागल ती वस्तू भरकटू लागली.

—खेळणी होती. प्रत्येक वेळेला वेडया आशेनं घेतलेली माया. हा मोर, हा पिंजऱ्यातला नाचणारा राघू, बंदुक घेतलेला चिमुरडा शिपाई व छोटा बाळकृष्ण' अशी अनेक खेळणी होती.

एक-एक खेळणं दूर भिकावयला सुरुवात केली. आपल्या अंगाचा दाह होतोय असं तिला वाटू लागलं.

मनातली चीड चेकाळली. तिच्या मनानं कच खाल्ली उगीच आपणच आपणांस संभ्रमात टाकलं ?

एका दमात ती श्वास रोधून ती विचार करीत होती. आपल्या देहाच्या चिंध्या करून पाण्यात भिजत घालाव्यात असं तिला वाटू लागलं.

बडबड करीत असतानाच तिला बेशुद्धी आली.

आयाबाया जमा झाल्या. कुणीतरी रत्नाच्या नवऱ्याला बोलावणं पाठवलं. नारू आला. तशा अवस्थेत तिला पाहून त्याला वाईट वाटलं. त्यानं एक भाडयाची बैल-गाडी आणली आणि त्यात ठेवून रत्नाला सरकारी दवाखान्यात घेऊन गेला.

तिथं तिला थोडीशी शुद्ध आली. आपण कुठं आहोत याचा क्षणभर तिला विचारच करता येईना. धावणारी माणसे, पांढऱ्या पोशाखातल्या पऱ्या चेहऱ्यावरची एकही सुरकुती न हलवता इकडून तिकडे करीत होत्या.

मध्येच तिला कुणीतरी औषध पाजलं. औषधाचे ते गोड-कडू मिश्रित थेंब पोटात गेल्यावर तिला बरं वाटलं.

क्षणात तिला झापड आल्यासारखी वाटू लागली. नजरेसमोर अंधुक अंधुक होत गलं. जवळ जवळ तीन तासांनी ती शुद्धीवर आली.

पांढऱ्याशुभ्र दातांच्या फटीतून कोवळंझार हंसत नर्स म्हणाली," मुलगा. अगदी सुंदर, बाळसेदार आहे हं."

पण ती गप्पच !

खिडकीतून मंद वारा रत्नाच्या फिकट गोऱ्या गालाशी खेळत होता. तिच्या चर-बटलेल्या बटांशी हलक्या हातांनी वारा खेळत होता, नाजूक साद घालत होता तिला सगळं हलकं हलकं वाटत होतं.

प्रत्येक खेपेस निराशेने झाकाळलेली ती गप्प झाली होती.

तिची सारासार विचारशक्तीच नष्ट होती. दरवाजा उघडला गेला आणि तिनं मान वळवून पाहिलं. नारू, तिचा नवरा, येत होता. तिच्याजवळ त्यानं येऊन चहाचा तांब्या व कपबशी स्टुलावर ठेवली.

त्यानं तिला हळूच गोड साद घातली ' रत्ना.' ती हाक, तो मनात प्रिय वाटणारा आवाज तिच्या अंत:करणात खोलवर नाचत गेला.

तिच्या मानेखाली हात घालून, तिला चहाचा घोट त्यानं पाजला. नेहमीप्रमाणं व्हायचं ते झालंय ना ? होऊ दे ! आपला पराजय झालाय असं तिला वाटू लागलं. मग ' ह्यांच्या '– नवऱ्याच्या– चेहऱ्यावर एवढा कसला बरं आनंद ?

झट्दिशी ती अंग झाडल्यासारखी बोलू लागली " जाऊयानं "

" कुठं ?" नवऱ्याला आश्चर्य वाटलं.

ती बोलली, " आपल्या घरी, तुमच्या पोटाचं हाल मला इथं राहून बघवणार नाहीत. "

मग मात्र नारू हसू लागला. " आता मी आणि तू नाही, तर आपलं बाळ आहे. तुला फुलासारखी मी जपणार आहे" असं त्यानं म्हणताच तिचे डोळे विस्फारले गेले. अन् पांढऱ्याशुभ्र फडक्याच्या दुपट्यात एक इवलासा जीव वळवळत होता. पाळण्यातल्या त्या पांढऱ्या, मांसाच्या गोळ्याला पाहून तिचा मनातनं एकदम आनंद फुटला.

नकळत तिच्या काळ्या करंद पापण्यांतून दोन थेंब गालावर ओघळले.

अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनं तहान शमलेली होती. ○


ज्वलंत राष्ट्रवादाच्या
भयानक दीप्तीचा
ललितभव्य आलेख

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

रा. म. शास्त्री

मूल्य पचवीस रुपये

' माणूस 'मधून प्रसिद्ध झालेल्या
प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन,
४१९ नारायण पेठ, पुणे २.

# पुस्तके

मराठी माणूस आणि नाट्यकला यांचे अविभाज्य नाते सुप्रसिद्ध आहे. नाट्यकला हे मराठी अस्मितेचे एक अविभाज्य आणि आवश्यक लक्षण आहे, असे नेहमीच मोठ्या अभिमानाने सांगितले जाते. नटांच्या जीवनाविषयी आणि चरित्राविषयी मराठी माणसाला मराठी नाट्यकलेच्या आरंभापासून तो आजतागायत सारखेच कुतूहल वाटत आलेले आहे. आणि त्या दृष्टीनेच नटांनी, नाटककारांनी आणि नाट्यव्यवसायी व्यक्तींनी लिहिलेली चरित्रे आणि आत्मचरित्रे संख्येने थोडी असली तरी कितीतरी लोकप्रिय ठरली आहेत. मात्र आजवर मराठीत निर्माण झालेल्या अशा प्रकारच्या पुस्तकांचे स्वरूप बरेचसे नुसते निवेदनात्मकच होते. काही गाजलेल्या भूमिकांविषयी, वेगवेगळ्या नटांनी खुलविलेल्या त्या त्या भूमिकेच्या विविध अंगोपांगांविषयी अभ्यासपूर्ण, विश्लेषणात्मक काही लेखन करावे अशी आजवरच्या संबंधित लेखकांची भूमिका नव्हती. नाटककंपन्यांतील अंतर्गत व्यवस्था, भांडणे, हेवेदावे, कर्ज वगैरे गोष्टींचीच तपशिलवार माहिती बऱ्याच ठिकाणी सापडते. या गोष्टींचेही सामान्य माणसाला थोडेफार कुतूहल असते; नाही असे नाही. तथापि, विचक्षक रसिकाची अभ्यासपूर्ण विश्लेषणाची तहान त्यामुळ भागत नाही.

श्री. के. वा. मोळे यांच्या 'अंतरा' या नव्या पुस्तकात अशा तऱ्हेची बौद्धिक तहान भागविण्याचा प्रशंसनीय प्रयत्न आहे. या प्रकारच्या लिखाणाचा हा पहिलाच प्रयत्न आहे असे नव्हे. परंतु नाट्यक्षेत्रातील महत्त्वाच्या समस्यांची तत्त्वशुद्ध बैठकीवरील वैचारिक चर्चा, गाज-

**निशिकांत मिरजकर**

## जुनी गरज भागविणारे नवे पुस्तक

लेल्या विविध भूमिकांचे रसिकतेने केलेले नाट्यशास्त्रीय विश्लेषण आणि ऐतिहासिक सत्याचे तपशीलवार विवेचन या सर्वांचा नाट्यव्यवसायाशी संबंधित अशा व्यक्तीच्या लेखनात झालेला हा संयोग मात्र अपूर्व म्हणण्यास हरकत नाही.

विशेषत:, नाटकांतील भूमिकांच्या नाट्यशास्त्रीय विश्लेषणाची मराठीमध्ये बरीच वाण आणि म्हणून आवश्यकता आहे. नाटककार नाटकांमध्ये पात्रांची भूमिका रंगविताना आपल्या मनाला प्रतीत झालेली त्यांची व्यक्तिरेखा संवादांमधून उभी करीत असतो. या व्यक्तिरेखांना प्रत्यक्ष रंगभूमीवरील नटांच्या हालचालींनी, अभिनयाने पूर्णता येते. निश्चित आकार प्राप्त होतो. वेगवेगळ्या नटांच्या भावनाविष्करणातून भूमिकेला वेगवेगळे पैलू पडत जातात. किंबहुना एकाच नटाच्या अभिनयातील कौशल्याच्या वृद्धीबरोबरच भूमिकेचाही सर्वांगीण विकास होत जातो. सहृदय अशा एखाद्या नाट्यरसिकाने भूमिकेच्या या विकासाचे अभ्यास आणि आल्हाद या दोन्ही दृष्टींनी केलेले विश्लेषण महत्त्वाचे ठरते.

### मार्मिक लेखन

भोळयांनी केलेल्या विश्लेषक विवेचनातील अभ्यासू वृत्ती, त्यांच्या निरीक्षणातील सूक्ष्मता आणि विवेचनांती काढलेले मार्मिक निष्कर्ष यांमुळे 'अंतरा' चांगलाच वजनदार झाला आहे. नटांच्या साध्यासुध्या हालचालींमधील सहजतेमुळे यथार्थपणे निर्माण होणारी वास्तवता, एखाद्या नटाच्या गायनामधील विविध बारकावे, गायन आणि वादन यांच्या परस्पर पोषणातून घडणारी रसाभिव्यक्ती वगैरे गोष्टींची संगतवार छाननी त्यांनी केली आहे. लहानपणीच (१९०३ साली) पाहिलेल्या पहिल्याच नाटकातील "गाणाऱ्यांच्या चढत्या – उतरत्या स्वरांबरोबर त्या त्या स्वरांचे तबले भास्करराव वाजवीत. त्यामुळे त्या गाण्यात आणखी सौंदर्याची भर पडे," यांसारख्या गोष्टी भोळयांनी अगदी आवर्जून लिहिल्या आहेत. यावरूनच त्यांच्या निरीक्षणातील सूक्ष्मतेची साक्ष पटावयास हरकत नाही. भाऊराव आणि बालगंधर्व यांनी रंगविलेल्या सुभद्रेच्या भूमिकेतील बारकाव्यांची मार्मिक तुलना करताना, सावकारांनी रंगविलेल्या रेवतीच्या भूमिकेचे रसिकतेने रसग्रहण करून

नृत्यनाट्याच्या नवनाट्यप्रकाराचा पाया त्यामध्ये पाहताना अथवा गणपतराव भागवतांनी रंगविलेल्या कीचकाच्या भूमिकेची परिणामकारकता कशामध्ये आहे याचे तपशीलवार स्पष्टीकरण करताना त्यांची अभ्यासू वृत्ती प्रकर्षाने दिसून येते. त्यांनी केलेले विविध भूमिकांचे विश्लेषण हा एक सखोल अभ्यासच झाला आहे. तसेच महाराष्ट्रीय चित्रपटकलेच्या उत्कर्षापकर्षाचे विश्लेषण करतानासुद्धा अशीच मार्मिकता ते दाखवितात. एकंदरीत विश्लेषण करणे, छाननी करणे हे भोळे यांच्या 'अंतरा'मधील लेखनाचे वैशिष्टय म्हणून मानण्यास हरकत नाही. विचारशील प्रतिभेचे हे एक महत्त्वाचे वैशिष्टय असते.

अशा तऱ्हेचे विश्लेषण करीत असताना ठिकठिकाणी अनेक प्रासंगिक उल्लेखांचे वेळी भोळयांनी काही तात्त्विक प्रश्नांचा जाताजाता ऊहापोह करून त्या त्या विषयांतील आपली मौलिक मते व्यक्त केली आहेत.

नाटकातील संगीत हा मराठी नाटकांच्या परंपरेतील आणि तदनुषंगिक नाट्य-चर्चेतील एक महत्त्वाचा भाग आहे. नाट्यसंगीताविषयी प्रेक्षकांची प्रतिक्रिया आणि नाट्याच्या दृष्टीने संगीताचे नाटकातील स्थान यांविषयी आजपर्यंत बरीच सांगोपांग चर्चा झालेली आहे. भोळयांचे याबाबतचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे दिसतात :

१. तत्कालीन प्रेक्षकांनी अभिनयाकडे संपूर्ण दुर्लक्ष करून केवळ नटांच्या संगीतातील प्राविण्याचा उदोउदो केला. तथापि, अभिनय हे संगीताइतकेच महत्त्वाचे अंग असून दोन्हींची क्रिया परस्पर पोषकच झाली पाहिजे.

२. संगीत आणि साथीची वाद्ये यांनी परस्परांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न न करता परस्परांचा मिलाफ साधला पाहिजे.

३. चित्रपटातसुद्धा संगीत हे प्रसंगाच्या अपरिहार्य अनुसंधानाने आले तरच परिणामकारक होते, नाहीतर स्वतंत्रपणे चाली मधुर असूनही ते फुकट जाते.

आणखीही कित्येक महत्त्वाच्या नाट्यविषयक मुद्यांवर भोळयांनी मौलिक विचार मांडले आहेत. नटांच्या अभिनयात अतिशयोक्ती अथवा विसंगती असू नये म्हणून दिग्दर्शक आणि नाटककार या दोघांनीही दक्ष राहिले पाहिजे असा त्यांच्या विवेचनाचा सूर आहे. स्त्रियांच्या भूमिका केशवराव, भाऊराव, दीनानाथ, बालगंधर्व वगैरे पुरुषांनी गाजविलेल्या असल्या तरी त्या जर अभिनयकुशल स्त्रियांनीच केल्या असत्या तर जास्त सरस, मर्मग्राही आणि यथार्थ झाल्या असत्या असे त्यांचे आग्रहाचे प्रतिपादन आहे. अनक उदाहरणांनी त्यांनी ते ठिकठिकाणी स्पष्ट केले आहे. नाटक ही एक संमिश्र जबाबदारी आहे. नाटकाचे यश हे नाट्यसंचाचे संयुक्त यश आहे, हेही त्यांनी वारंवार स्पष्ट केलेले आहे. या दृष्टीनेच नाटकाच्या दिग्दर्शकाला फार मोठी जबाबदारी सांभाळावी लागते.

नाट्यसृष्टीप्रमाणेच चित्रपटव्यवसायाशीही श्री. भोळे यांचा निकटचा आणि जिव्हाळयाचा संबंध आल्यामुळे चित्रपटाविषयीच्या समस्यांची चर्चाही त्यांनी

आत्मीयतेने आणि मूलगामी दृष्टीने केली आहे. महायुद्ध, महागाई, त्यामुळे निर्माण झालेली साधनांची दुर्मिळता वगैरे गोष्टींमुळे उत्तरोत्तर खालावत जाणाऱ्या चित्रपटाच्या दर्जाची त्यांनी अभ्यासपूर्ण मीमांसा केली आहे. चित्रपटसृष्टीत प्रचलित असणाऱ्या गैरसमजुतींची आणि भ्रमांची खुलासेवार चर्चा त्यांनी केली आहे. (१) नावीन्याचे वेड (२) तंत्रकौशल्याचा भ्रम (३) आवाक्याबाहेरचे विषय घेण्याची फसवी जिद्द (४) निर्बुद्ध नटांकडून काम करून घेण्याची अस्थानी ईर्ष्या वगैरे दोषांचे बाबतीत नेमके बोट ठेवून त्यांनी दिग्दर्शकांच्या चुकांचे जसे नेमकेपणाने विवरण केले आहे, तसेच " चित्रपटकलेचे माध्यम गतिमान चित्रे नसून संवाद आहेत, या भ्रमाने आमच्या संवादलेखकांना पछाडल्यामुळे बिचाऱ्या प्रेक्षकांचे कान बधीर झाले आहेत, " अशा तऱ्हेच्या मार्मिक विधानांनी चित्रपटाच्या इतर अंगांतील उणीवा दाखवतात. ' प्रभात 'सारख्या संस्थेचा साद्यंत इतिहास त्यांच्या या क्षेत्रातील विचारशील चिंतनाची साक्ष पटवितो.

## ' अंतरा 'तील ' मी '

तथापि, या सर्व विचक्षक विचारशीलतेला गालबोट लावणारी एक गोष्ट मात्र खूपच खटकते. श्री. भोळे हे मान्यवर विचारवंत आहेत, नाट्य आणि चित्रपटक्षेत्रातील व्यासंगी अधिकारी आहेत, हे कोणीही मान्य करील. पण या त्यांच्या अधिकाराला ठिकठिकाणी ' मी 'चा दर्प चढलेला दिसतो. नाट्य आणि चित्रपटविषयक समस्यांचे बाबतीत भोळ्यांचे मत मोलाचे असेल, नव्हे, आहेच—पण ते इतरांनी ठरवायचे असते. स्वतःच स्वतःचा बडेजाव माजविणे हे भोळ्यांच्या स्थानावरील व्यक्तीला खचितच भूषणावह नाही. अगदी साध्यासुध्या प्रसंगापासून महत्त्वाच्या शास्त्रीय विवेचनापर्यंत सर्वत्र लेखकाने ' मी 'ला आग्रहाने पाचारण केलेले दिसते. " माझे शेजारी स्वरूपावर व गोड आवाजावर खूष असल्यामुळे इतर गोष्टी त्यांना सुचत नव्हत्या. पण...मला ही निराळी दृष्टी तेव्हा अनुभवाने आली होती. म्हणूनच इतरांपेक्षा माझ्या अपेक्षाहीं निराळ्या होत्या, " " प्रथम प्रथम शांतारामांचा गैरसमज झाला होता, की आम्ही फक्त पुस्तकी लोक आहोत. परंतु आम्हीही अनुभव घेतलेले होते. प्रयोग केलेले होते," " शेवटी एक प्रसंग साधून त्यांनी माझ्याजवळसुद्धा त्यांच्याशी मध्यस्थी करण्याची गळ घातली " वगैरे साध्यासुध्या वाक्यांतूनसुद्धा त्यांच्या ' मी 'चा दर्प आढळून येतो. लेखकाने स्वतःची मते सांगूच नयेत असे नव्हे. परंतु बाकीचे सर्व लोक आपल्या खालच्या पातळीवर असून आपण कुठून तरी उंच ठिकाणाहून त्यांच्याकडे पाहत आहोत अशा वृत्तीने हे मतप्रदर्शन करू नये. लेखकाचे उंच स्थान त्याच्या दर्जेदार लिखाणावरून वाचकांनी त्याला द्यायचे असते. लेखकाने स्वतःच ते असे हिसकून घ्यायचे नसते. भोळ्यांनी मात्र ते अनेक ठिकाणी केले आहे. त्यामुळे त्यांनी रंगविलेली बरीच शब्दचित्रे निष्कारणच डागळली आहेत. लेखकाच्या व्यक्तित्वाखाली दडपून गेली आहेत. उदा.

सौ. ज्योत्स्ना भोळे यांच्याविषयी लिहिताना ज्योत्स्नाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाच्या स्वाभाविक विकासापेक्षा श्री. भोळे यांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे 'बनविले' याचे श्रेयनिर्देशनच जास्त दिसते. केशवराव भोसले, बालगंधर्व वगैरेंविषयींचे लेखन श्री. भोळे यांच्या त्यांच्याविषयीच्या पूर्वग्रहांनी बरबटलेले आहे. विशेषत: बालगंधर्वांविषयी भोळे यांचे मत फारसे चांगले नाही. बालगंधर्वांविषयी लिहिताना त्यांनी बऱ्याच वेळा त्यांच्याविषयी अनुदार उद्‌गार काढलेले आहेत. त्यातील बरेचसे उद्‌गार समर्थनीय आणि सकारण असले तरी काही अकारणसुद्धा आलेले आहेत. "साहेबमामा" हे एक शब्दचित्र सर्वप्रकारच्या दोषांपासून विमुक्त असून साहेबमामांविषयींची नितान्त आपुलकी आणि जिव्हाळा यांमुळ आकर्षक बनले आहे. श्री. भोळे हे एक सिद्धहस्त लेखकही आहेत, हे अशा तऱ्हेच्या शब्दचित्रांवरुन चांगले प्रत्ययास येते.

नाट्यसमीक्षक, अभ्यासक, संगीतज्ञ आणि लेखक या सर्व भूमिकांच्या समन्वयामुळे श्री. भोळे यांनी अनेक मौलिक विचार ठिकठिकाणी विखरून ठेवलेले आहेत. संबंधित विषयांवरची ही प्रवचनात्मक सूत्रेच बनली आहेत. "खरा नट सर्व बंधने तोडून मानवजातीला आवाहन करीत असतो." "नाटककाराचा हेतू आपल्याला जेवढा समजला असेल तेवढा सहीसही अगदी पिटातल्या प्रेक्षकांपर्यंत यथामार्ग, यथाशक्ती पोचवायचा आहे ही नटाची जबाबदारी फार मोठी व महत्त्वाची..." "नाटक हे सर्वांना मिळून एकमेकांना साथ देऊन करण्याचे एक प्रकारचे यज्ञकर्म आहे, सांघिक कार्य आहे," "जेव्हा साधने दुर्मिळ व महाग होतात आणि जरासा कलानिष्ठेशी द्रोह केल्यास खूप पैसा मिळतो तेव्हाच कलानिष्ठ, ध्येयनिष्ठ कलावंताची अवस्था मोठी बिकट होते," अशी कितीतरी सुभाषिते सर्वत्र विखुरलेली आहेत.

भोळे यांचे हे पुस्तक परिपूर्ण नाही. एकमेव नाही. पण त्यातील लेखन मूलगामी आहे. विचारप्रवर्तक आहे. महत्त्वाचे आहे. जुन्या नाट्यरसिकांनी (आणि नव्याही) अशा तऱ्हेची पुस्तके आणखी कितीतरी लिहिली पाहिजेत. मनमोकळी चर्चा केली पाहिजे. विश्लेषण केले पाहिजे. आपले अनुभव उघड करून सांगितले पाहिजेत. मराठी वाङ्मयाची ती एक गरज आहे. O

['अंतरा' : के. वा. भोळे : किंमत
साडेबारा रुपये : मौज प्रकाशन : पृ. २२६]




## हरीभाऊ साने
## एक विशुद्ध क्रीडाजीवन

**श्री.** हरिभाऊ साने यांना १५ नोव्हेंबर रोजी साठ वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने ३ डिसेंबरच्या रविवारी गोखले हॉलमध्ये महापौर नानासाहेब गोरे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सन्मान आणि सत्कार करण्यात आला. 'सन्मित्र संघा'चे गेल्या चव्वेचाळीस वर्षांचे कुशल संघटक आणि संस्थापक, शालेय व महाविद्यालयीन क्रीडाजीवनातील एक उत्तम खेळाडू व निर्भय संघनायक, पुणे विद्यापीठाचे कबड्डी आणि खोखोचे शिक्षक आणि निवड–समिती सदस्य, न्यू इंग्लिश स्कूलमधील शिस्तप्रिय शिक्षक, भारतीय खेळांवर नियमित लिहिणारे विचक्षण समालोचक आणि आदर्श गृहस्थ या नात्याने हरिभाऊ कुणाला माहीत नाहीत असे नाही. अन्य सामाजिक क्षेत्रांतही हरिभाऊंनी हिरीरीने प्रचंड कार्य केलेले आहे.

हरिभाऊंनी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये क्रीडा शिक्षक असताना पंधरा वर्षे लंगडी, खोखो, आटयापाटया, हुतुतू (कबड्डी), रस्सीखेच अशा विविध खेळांचे विजेतेपद मिळवून दाखविले. एखादी गोष्ट त्यांच्या मनाने हेरली की त्याच्यात त्यांनी तळमळीने लक्ष घातलेच. आणि कार्य अंगावर घेतले की तडीस नेण्यासाठी वाटेल ते कष्ट करावयाची त्यांची तयारी असावयाची. पहाटे पाच वाजल्यापासून ते रात्री अकरा वाजेपर्यंत प्रांजलपणे क्रीडांगणाची, क्रीडापटूंची आणि

मनोहर रेगे

क्रीडाक्षेत्राची सेवा त्यांनी केली आहे. कधी खंड नाही, की आळस नाही. तरुणांना लाजवितील अशा अहमहमिकेने आजही, तुम्ही म्हणाल ते कार्य ते पार पाडू शकतील.

शरीरसौष्ठव वाढविण्याचे शास्त्रशुद्ध संशोधन आणि कार्य त्यांनी केले. केवळ हरेक वजने उचलूनच शरीर बांधेसूद होते हे त्यांना मान्य नाही. तर अनेक प्रकारचे भारतीय व्यायाम घेण्याने ते पीळदार बनते. हे त्यांनी सिद्ध करून दिले. राष्ट्रीय खेळांची शिक्षण–शिबिरे भरवून त्यांत खेळांची तांत्रिक आणि प्रत्यक्ष माहिती प्रथमच त्यांनी महाराष्ट्राला दिली. त्यामुळे भारतीय खेळांच्या प्रगतीला एक नवा जोम प्राप्त झाला. शारीरिक सामर्थ्याचा योग्य तो वापर आणि बौद्धिक कौशल्याची योग्य ती सांगड त्यांनी खेळात घातली. त्याचा परिणाम म्हणजे आजही तुम्ही सन्मित्र संघाचे नवे नवे खेळाडू पाहा, त्यांच्यात विलक्षण क्रीडापटुत्व निर्माण झाल्याचे तुम्हांला आढळून येईल.

अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळाचे कार्य हरिभाऊंनी १९३५ सालापासून केले. कुलाबा जिल्ह्याच्या क्रीडा महोत्सवाला पाच वर्षे साहाय्य केले. निरनिराळ्या ऑफिसेसमधून भारतीय खेळ नेले. परंतु हरिभाऊ खरे जगले ते ' सन्मित्र संघा 'तच. हरिभाऊ जर इतके जुने–जाणते कार्यकर्ते आणि अधिकारी तर मग ते राष्ट्रीय संस्थांवर का काम करीत नाहीत ? असा प्रश्न आम्हांला अतिरथी नेहमी विचारतात. चाळीस वर्षे त्यांनी कार्य केले म्हणता पण छोटयाशा क्षेत्रातच ना ! या आक्षेपाला माझ्याजवळ एक उत्तर आहे. आणि ते म्हणजे हरिभाऊ विशुद्ध क्रीडाजीवन जगले. जेथे चांगली वागणूक, चांगले वातावरण दिसले तेथेच ते थांबले. उत्तम खेळाडू बनण्यासाठी आवश्यक असणाऱ्या एकाग्रचित्त; शिस्तप्रियता, कष्ट करण्याची तयारी, धडाडी आणि हिंमत जिथे त्यांना आढळली तेथेच ते थांबले. आणि म्हणूनच सन्मित्र संघात ते विसावले. क्रीडाजीवनातील विरंगुळा त्यांना मानवला तो अशा उत्साहवर्धक वातावरणातच, की जिथे काही मानवी नैतिक मूल्ये इतस्तः विखुरली होती. " ३५ वर्षे लग्न होऊनही मंडळीबरोबर आपण साधे पातळ आणावयाससुद्धा गेलो नाही, " अशी प्रांजल कबुली त्यांनी सत्काराप्रसंगी दिली. जे क्षेत्र आपले नव्हे तिथे त्यांनी कधीच ढवळाढवळ केली नाही. हा हरिभाऊंचा चांगुलपणा मला विशेष महत्वाचा वाटतो. राष्ट्राच्या किंवा महाराष्ट्राच्या क्रीडास्पर्धांत त्यांची उपस्थितो नसली तरी त्यांचे आशीर्वाद जरूर आहेत. मात्र ज्या वेळी सबंध भारतामधील क्रीडाक्षेत्रात–मग ते क्षेत्र कबड्डीचे असो की क्रिकेटचे असो–जीवनातील उच्च मूल्ये रुजतील आणि फोफावतील तेव्हाच हरिभाऊंसारखी अनेक व्यक्तिमत्त्वाची वलये तेथे प्रकाशत आणि रेंगाळत राहतील ! म्हणूनच हरिभाऊ साने यांच्या षष्टयब्दपूर्तीनिमित्त त्यांचे अभिनंदन करताना आणि दीर्घायुष्य चिंतिताना त्यांच्या विशुद्ध क्रीडाजीवनापासून आमचे क्रीडासंचालक काही चांगला बोध घेतील अशी आशा वाटते.

# कॉन्रड हंट यांची निवृत्ती

वेस्ट इंडिजचे आघाडीचे धीमे फलंदाज कॉन्रड हंट प्रथमश्रेणी क्रिकेट स्पर्धेतून निवृत्त झाले. लंडनच्या एका डॉक्टरांनी त्यांना गुडघ्याच्या त्रासाकरिता विश्रांतीचा सल्ला दिला आणि हंट यांनी वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाला कळवून टाकले की इंग्लंडविरुद्ध सुरू होणाऱ्या कसोटी सामन्यात आपण खेळू शकणार नाही. हंट यांनी कसोटी कारकीर्दीत ४५·०६ धावाच्या सरासरीने ३२४५ धावा रचल्या. वेस्ट इंडिज संघात चमकदार खेळाचे वारे फार. पण हंट त्या फंदात कधीच पडले नाहीत. सलामीला येऊन चिवटपणे संघाचा पाया मजबूत करावयाचा असा शास्त्रशुद्ध प्रपंच त्यांनी केला. त्यात ते कमालीचे यशस्वी ठरले. अजूनही त्यांना साथीला उत्तम फलंदाज आघाडीच्या जोडीत मिळाला नाही यारूनच त्यांचे कर्तृत्व आणि वेस्ट इंडिज संघातील स्थान लक्षात येते.

दुर्दैवाने भारतामधल्या क्रिकेटपटूंना केव्हा थांबावे हे समजत नाही. त्यांच्या खेळाडू जीवनाला उशीरा सुरुवात होते. वेळच्या वेळी त्यांना संधी मिळत नाही. आणि मग शरीराची बोळवण झाली तरी ते खेळत बसतात. त्यामुळे नव्या चांगल्या खेळाडूंच्या वाटा रोखल्या जातात. असे हे वर्षानुवर्षे चालत आहे. यात कुठे तरी सुसूत्रता आणणे जरुरीचे आहे. ऑस्ट्रेलियास जाणाऱ्या भारतीय क्रिकेट संघात हुकूमसिंग यांना प्रवेश नाकारला याचे कारण त्यांचा शारीरिक दुबळेपणा. पण तो ठरविण्यासाठी खडकवासल्याला घेतलेल्या 'मेडिकल कँप' ची गरज भासली. स्वतःहून भारतीय खेळाडू आपली असमर्थता कधी कळवत नाहीत. इंग्लंडला गेलेल्या भारतीय क्रिकेट संघातील ते दोन मध्यमगती गोलंदाज म्हणे दौऱ्याच्या सुरुवातीलाच शारीरिक तंदुरुस्तीत नव्हते, असा अप्रामाणिकपणा केवळ भारतीय खेळाडूंतच घडू शकतो हे आपले दुर्दैव होय. कॉन्रड हंट यांच्या निवृत्तीपासून हीच गोष्ट शिकण्यासारखी आहे की, जोम असेपर्यंत खेळा, एरवी नव्यांना वाट मोकळी करून द्या. ○

# इतिहासाला एक धक्का देण्यासाठी

लेनिनची धडपड सुरू होती
अव्याहत तीस वर्षे.




१८८७ मध्ये त्याने प्रतिज्ञा केली होती
'माझ्या भावाला सुळावर चढविणारी
झारशाही मुळासकट खणून काढीन.'

कालांतराने या प्रतिज्ञेला
पुस्ती जोडण्यात आली–
'कामगारांची आणि शेतकऱ्यांची
समाजवादी राजवट प्रस्थापित
करण्यासाठी मी जगभर
क्रांतीचा वणवा पेटवीन.'

नेचॅयेव्ह आणि बाकुनिन
यांच्या भाषेत मार्क्स
मिसळला गेला होता.

एक अभिजात क्रांतिकारक
निराळेच स्वप्न पाहत होता

# संपूर्ण आणि सर्वंकष विनाशाचे

# ७ नोव्हेंबर १९१७ या दिवशी

या प्रतिज्ञेचा पहिला
भाग पूर्ण झाला

रशियन भूमीवर बोल्शेव्हिकांची
लाल राजवट सुरू झाली होती.

# ती होती एका नव्या युगाची नांदी

१९१७ ते १९६७
या पन्नास वर्षांच्या वाटचालीत
बोल्शेव्हिक राजवटीने
जगास काय दिले ?
त्याचाच मागोवा घेण्याचा
हा अल्पसा प्रयत्न.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

'माणूस'मध्ये गेले पंचवीस आठवडे
गाजलेल्या या लेखमालेचा
खळबळजनक उत्तरार्ध
लवकरच सुरू होत आहे.

लेखक : वि. स. वाळिंबे

१६ डिसेंबर १९६७

# भिंतीच्या तुंबड्या

। सुधाकर राजे ।

## लग्नाची सरकारी बेडी

वाचावे ते नवल ! इराणमध्ये म्हणे उपवधू मुले लग्नाविषयी इतकी अनास्था दाखवीत आहेत की लग्न करायची सरकारी सक्ती करण्यात यावी असे मत मांडण्यात येऊ लागले आहे. लग्नाची ही सरकारी बेडी पायात ठोकून बिचाऱ्या निरपराध तरुणांना स्वयंपाकघरात जन्मठेपीला पाठविण्याची ही कल्पना अजब आहे. मला वाटते रोज निमूटपणे मंडईत जाण्यापेक्षा रोज मुकाटयाने खडी फोडायला जाणे ही निश्चितच अधिक हलकी शिक्षा आहे. शिवाय तुरुंगात मिळणाऱ्या अनेक सवलती स्वयंपाकघरात मिळणे सुतराम् अशक्य. उदाहरणार्थ, जेलर जेवायला कोरडी भाकर अन् पाणचट आमटी देतो – पण " कसा झालाय् स्वयंपाक ?" असा अवघड प्रश्न तरी विचारीत नाही. दुसरे म्हणजे कैद्याने जेलरला रोज गजरा, आठवड्याला सिनेमा अन् महिन्याला साडी एवढी खंडणी विनतक्रार दिलीच पाहिजे,



असे कुठल्याही तुरुंगाच्या नियमात लिहिल्याचे मला तरी माहीत नाही. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कैद्याला चांगल्या वागणुकीबद्दल कैदेच्या मुदतीत कपातीची सवलत मिळते. हे भाग्य कुठल्या नवऱ्याच्या नशीबी आहे ?

## सत्याची वार्षिक परीक्षा


माणूस केव्हा काय विचित्रपणा करील हे सांगता यायचे नाही. त्यातून तो मंत्री असला की विचारायलाच नको. काही दिवसांपूर्वी बातमी वाचली की, बिहारचे एक मंत्री बी. ए. च्या परीक्षेला बसले. आहे की नाही वेडपटपणाचा कळस ? कुठल्या गाढवाने या मंत्र्याला सांगितले की राज्य करायला शिक्षण

लागते ? राज्य करायला शैक्षणिक पात्रता अजिबात लागत नाही हे आपल्या घटनेतदेखील कबूल केले आहे. तेव्हा बी. ए. होण्याचा हा औद्योगिक खटाटोप या मंत्र्याला शोभतो का ? म्हणून मंत्री आणि मेंदू, पद आणि पदवी या परस्पर विरोधी गोष्टी एकत्र आणण्याचा हा हव्यास म्हणजे एक नंबरचा विक्षिप्तपणा म्हणावा लागेल. त्यातून गंमत अशी की हे मंत्रीमहाशय म्हणे परीक्षेत कॉपी करताना पकडले गेले. आता बोला ! 'सत्यमेव जयते' हे सरकारी ब्रीदवाक्य खरे असले तरी सत्याची परीक्षा व्हायला लागली तर ते नापास होण्याचीही भीती असते याचाच हा पुरावा नाही का ? म्हणून म्हणतो, मंत्र्याने आपल्या स्टेटसला शोभेल असा अशिक्षितपणा जपून असावे, कारकुनाप्रमाणे शिक्षणाच्या मागे लागू नये.

## ☐ नम्रतापूर्वक चालणारी बस

म्युनिक नगरपालिकेने बस आणि ट्राम-ड्रायव्हरांना नम्रता शिकविण्यासाठी एका मानसशास्त्रज्ञाची नेमणूक केली आहे. कमाल आहे ! दिल्लीचे बस-ड्रायव्हर वर्षातून एकदा नम्रतासप्ताह पाळतात आणि बाकीचे एक्कावन आठवडे उद्दामपणाने वागायला मोकळे होतात. हा साधा सरळ मार्ग सोडून म्युनिक नगरपालिकेला हे मानसशास्त्रीय दंड कोठून आठवले ? नम्रतापूर्वक चालणारी बस नगरपालिकेच्या नागरी संस्कृतीची खूण ठरेल अशी म्युनिकच्या मंडळींची अपेक्षा असल्यास नकळे. कदाचित साध्या विषयात मुळात नसलेला मोठा आशय शोधून काढायचा हा ठराविक पाश्चिमात्त्य हव्यास असेल. आपणा पौर्वात्य मंडळींना स्वप्न पडले की 'जेवण जरा जास्त झाले' अशी त्याची सरळसोट कार्यकारणमीमांसा लावून आपण मोकळे होतो, पण पाश्चिमात्त्य माणसाला पडलेल्या स्वप्नाचा अन्वयार्थ लावायला फ्रॉइडचा लिबिडो लागतो. त्यातलाच हा प्रकार.

हा मानसशास्त्रज्ञ दिल्लीच्या बसच्या ड्रायव्हरांना नम्रतेचे धडे शिकवायला आला तर काय होईल ? —महिन्याच्या आत त्याचेच डोके तपासण्यासाठी त्याला दुसऱ्या एखाद्या मानसशास्त्रज्ञाकडे पाठवायची पाळी येईल. कारण थांबताना बस मुद्दाम दहा फूट पुढे न नेता नेमकी स्टॉपवर थांबविणे, आत उभी असलेली सर्व माणसे एकाच दणक्यात आडवी होतील तेवढा धक्का बसू न देता बस थांबविणे किंवा चालू करणे, पावसाळ्यात जवळपासच्या पादचाऱ्यांना चिखलाचे अभ्यंगस्नान न घालता बस हाकणे असल्या फालतू आणि निरर्थक गोष्टींची महती दिल्लीच्या बस-ड्रायव्हरांना हा मानसशास्त्रज्ञ कधीच पटवू शकणार नाही. ○





# आमची ललितकलादर्श

## लेखक — कलाकार

चित्तरंजन कोल्हटकर
अनंत श्रीपाद साखरे
महादेव कृष्ण वेलणकर
अ. दे. पाटील
गोविंद पटवर्धन
दामुअण्णा पार्सेकर
लीला मेहता

संकलन : सुधीर दामले



दर्जेदार नाटचप्रयोग सादर करणारी संस्था असा नावलौकिक संपादन केलेली 'ललित कलादर्श,' १ जानेवारी रोजी आपल्या वयाची साठ वर्षे पूर्ण करीत आहे. ही संस्था सतत साठ वर्षे का टिकली? सतत लोकप्रियताच का मिळवत गेली? उत्तम नाटच प्रयोग हे एक कारण असू शकेल. पण त्याचबरोबर संस्थेला लाभलेले नेतृत्वही त्याला कारणीभूत ठरले का? ललितकलेच्या निरनिराळ्या कलाकारांनी दिलेल्या मुलाखतींवरून संस्थेच्या साठ वर्षांच्या उभारणीचे रहस्य कळू शकते.

६०



**एक निर्माता या नात्याने नवे नवे प्रयोग करून पाहण्याची त्यांची हौस, जिद्द, धडपड आणि दृष्टि, या गोष्टी मला फार महत्त्वाच्या वाटतात.**

**चित्तरंजन कोल्हटकर**

चित्तरंजन कोल्हटकर हे 'ललितकले 'चे एक प्रमुख कलाकार !

ते तर म्हणतात की, स्वत:चा तेजस्वी भूतकाळ, उज्ज्वल परंपरा असलेली ही एकमेव नाटचसंस्था आज रंगभूमीवर काही कार्य करीत आहे. भालचंद्र पेंढारकरांचे वैशिष्टच असे की ही परंपरा, हा भूतकाळ त्यांनी मोठचा जिद्दीने कसोशीने सांभाळला आहे. ललितकलादर्शचा प्रयोग म्हटला म्हणजे प्रेक्षक काही विशिष्ट अपेक्षा बाळगून येतात. त्यांच्या या अपेक्षांना आजवर कधीही धक्का लावला गेलेला नाही ही गोष्ट विशेषत्वाने नमूद करावीशी वाटते.

एक कलावंत म्हणूनही पेंढारकरांची योग्यता मोठी आहे. भूमिका करताना नटाजवळ आवश्यक असणारा असा प्रामाणिकपणा, चिकाटी, तळमळ आणि हौस या गोष्टी त्यांच्याजवळ भरपूर आहेत. तर निर्माता या नात्याने नवे नवे प्रयोग करून पाहण्याची जिद्द, धडपड आणि दृष्टी या गोष्टीही मला फार महत्त्वाच्या वाटतात. आता काही वेळा त्यांचे प्रयोग फसलेही असतील; पण त्यामुळे घाबरून जाऊन आजही नवीन नवीन प्रयोग करून पाहण्याची त्यांची वृत्ती यत्किंचितही

कमी झालेली नाही. कोणताही प्रयोग करून पाहताना आवश्यक तो खर्च करायलाही ते मागेपुढे पाहत नाहीत. मग या वेळी आपला प्रयोग पुढेमागे फसेल. आपले काय होईल हा विचारही ते आधी करत नाहीत, याच त्यांच्या गुणामुळे आजवरच्या एकाही प्रयोगात एक विशिष्ट दर्जा त्यांनी कधीही कमी होऊ दिलेला नाही. प्रयोगाला बाजारी स्वरूप येऊ दिलेले नाही. आपल्या सर्व शक्तीनिशी, सामर्थ्यासहित संस्था मोठी करायची हीच एक पोटतिडीक, ध्येय त्यांनी आजवर बाळगले आहे. ही गोष्टही मला फार महत्त्वाची वाटते. १९६१ साली कंपनीने काढलेला भारत-दौरा हा तर मराठी नाट्येतिहासात अभिनव, नावीन्यपूर्ण आणि क्रांतिकारक ठरावा असा होता. हे कार्य अलीकडील काळात एकट्या 'ललितकलेने'च केले हे लक्षात घेतले म्हणजे त्याचे महत्त्व कळून येईल.

भालचंद्र पेंढारकर कलाकार म्हणून जसे अत्यंत प्रामाणिक आहेत, त्याचप्रमाणे कंपनीचे मालक या नात्यानेही त्यांची योग्यता मोठी आहे. स्वभावाने अत्यंत प्रेमळ, विनम्र तर आहेतच; पण आपण एका कंपनीचे मालक आहोत हा टेंभा त्यांनी कधीही मिरविलेला नाही, किंवा त्या गुर्मीत कधी कुणाचा अपमानही केलेला नाही. त्यांच्या नम्र स्वभावाची एक आठवण सांगण्याजोगी आहे. उमरावतीला एक दिवस 'स्वामिनी'चे दोन प्रयोग होते. तिथल्या लोकांना प्रयोग फार आवडले. दोनही प्रयोगांना इतकी तुफान गर्दी होती, की आम्ही लगेच तिसरा प्रयोग करावा असा आग्रह सुरू झाला. आम्हा सर्वांची तयारी होती फक्त अडचण होती ती थिएटर मालकांची. लागोपाठ तिसऱ्या दिवशी थिएटर द्यायला ते राजी नव्हते. त्यांची समजूत घालावी म्हणून मी आणि अण्णा त्यांच्या ऑफिसमध्ये गेलो. आता माझा स्वभाव बोलका, त्यातून माझी आणि त्या थिएटर मालकाची किंचित ओळख त्यामुळे मी विषय काढला. अण्णा नुसते शेजारी बसून होते. बऱ्याच विनवण्या करून मालक काही तयार होईनात. पैशावरून सारे बिनसत होते. त्यामुळे अण्णा मध्येच "पैशाची काळजी नको हो, पण थिएटर हवे" अशाच अर्थाचे काहीतरी बोलले. हे वाक्य ऐकले आणि थिएटर मालक एकदम म्हणाले, "तुम्ही नका हो बोलू. तुम्हांला या व्यवहारातलं काय माहीत आहे? कोल्हटकरांना बोलू द्या!" आता आली का आफत? थिएटर मालक मलाच कंपनीचा मालक समजला होता खास! अण्णांच्या जागी दुसरा कुणी असता तर थिएटर मालकाला त्याने चांगलेच फटकारले असते, आपल्या अधिकाराची जाणीव करून दिली असती. पण अण्णा बिचारे गप्प बसले. आणि बोलण्याचा सारा मक्ता मलाच देऊन टाकला. त्या अवघडलेल्या परिस्थितीत मी बोलणे कसेबसे पूर्ण केले. थिएटर मिळाले आणि अण्णा उठून निघून गेले. मी मालकांना म्हटले, "अहो, कंपनीचे मालक ते आहेत, मी नाही!! तुम्ही त्यांनाच फटकारलेत कमाल आहे!!" आता माझे बोलणे ऐकून मालकांचा चेहरा पाहण्यासारखा झाला असला तरी एक गोष्ट खरी, की पेंढारकरांनी त्या मालकाला एखादा

वेडावाकडा शब्द सुनावून स्वतःच्या अधिकाराची जाणीव करून दिली नाही. ह्या प्रसंगीच काय पण इतर केव्हाही आपला मालकी हक्काचा गर्व ते बाळगीत नाहीत. हा गुण फार दुर्मिळ असतो. जणू ' ललितकलादर्श 'चा एक सेवक म्हणून ते वागतात. पोषाख पाहा ! गेल्या पंचवीस वर्षांत त्यांच्या कपड्यात जसा फरक पडलेला नाही; त्याचप्रमाणे आम्हा कलावंतांशी वागताना, तोच आपलेपणा, प्रेमळपणा ! ! विशेष म्हणजे नाटकातून जे काही मिळविले ते सारे संस्थेकरताच खर्च केले, स्वार्थ यत्किंचितही पाहिला नाही. या त्यांच्या वृत्तीमुळेच संस्थेला आज विशेष प्रतिष्ठा लाभलेली आहे. सर्वत्र तिचे नाव दुमदुमत आहे.

अशा या ' ललितकलादर्श 'मध्ये काम करायला लागल्याने नट म्हणून माझा फायदा कोणता झाला म्हणाल, तर काही दर्जेदार भूमिका करायला मिळाल्या हे तर खरेच, पण संस्थेच्या परंपरेमुळे गावोगावचे उचभ्रू, सुशिक्षित दर्जेदार प्रेक्षक पाहायला मिळाले. ही गोष्ट मी अभिमानाने कबूल करतो. □□



**आणि पेंढारकर ताडकन् म्हणाले लोंढ्यांना सांगा ' मी नाटकात काम केले ते तुमचा मित्र म्हणून, नोकर म्हणून, नाही.'**

**अनंत श्रीपाद साखरे**

' ललितकले 'तील सर्वांत जुने नोकर आणि आजच्या ' ललितकले 'तील कपडेपट प्रमुख श्री. अनंत श्रीपाद साखरे ! श्री. साखरे यांना संस्थेविषयी विलक्षण अभिमान ! ! ते म्हणाले, " अहो, आज माझे कोण आहे ? ना नातेवाईक, ना कोणी मायेचं माणूस; पण मला तसे कधीही जाणवत नाही. कारण मी स्वतःला पेंढारकर कुटुंबातलाच एक समजतो. विशेष असा की, पेंढारकरही मला त्यांच्या घरचा एक मानतात, त्याच भावनेने माझ्याकडे पाहतात. नाहीतर सांगा, कोणता मालक आपल्या नोकराला इतक्या आपुलकीने वागवतो ? मी बापूरावांकडे काम केले. आज अण्णांकडे करतो पण विशेष असा की, बापूराव नोकरांशी ज्या प्रेमाने, आपुलकीने वागत असत. तितक्याच प्रेमाने आज त्यांचे चिरंजीव भालचंद्रही वागतात.

१९३७ ते १९५६ पर्यंत मी ' ललितकले 'व्यतिरिक्त अनक नाटककपन्यांतून मेक-अप्मन म्हणून दिवस काढले आहेत. पण ' ललितकले 'सारखी प्रेमाची, आपलेपणाची वागणूक मला कुठेही मिळालेली नाही, हे सांगताना मला मुळीच संकोच वाटत नाही. माझे मालक माझ्याशी किती प्रेमाने वागतात या बाबतीतली दोन उदाहरणे सांगण्याजोगी आहेत.

नुकतेच माझ्या डोळयाचे ऑपरेशन झाले. डॉक्टरांनी विचारले, " तुमचे कुणी नातेवाईक यायचे आहेत ?" मी म्हणालो, " नातेवाईक कुणी नाहीत, येतील फक्त माझे मालक भालचंद्र पेंढारकर ! ! " मी हे सांगितले खरे, पण अण्णा, आले नसते तरीही त्यांना दोष देता येणार नव्हता, कारण मुख्य म्हणजे मी त्यांना ऑपरेशन होणार हे पूर्वी सांग शकलो नव्हतो. शिवाय अण्णा हीरकमहोत्सवाच्या गडबडीत असल्याने त्यांना वेळ मिळणेही फार कठीण होते. पण एक मन सांगत होते अण्णांना ऑपरेशनबद्दल कळणार, आणि ते जरूर येणार. आणि काय सांगू खरोखरच ऑपरेशन होऊन मी बाहेर आलो मात्र, अण्णांनी हाक मारली, " साखरे, मी आलोय बरं का ! " केवळ चारच शब्द. पण मला कोण आनंद झाला ! असाच दुसरा एक प्रसंग ! ! १९६१ साली माझ्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाली, आता एका सामान्य मेक-अप्मनचा वाढदिवस. त्याची आठवण मालक या नात्याने अण्णांना ठेवायची काहीच जरूरी नव्हती. पण तसे घडले नाही. पुण्यात ' पंडितराज जगन्नाथ 'चा प्रयोग होता त्या नाटकाच्या मध्यंतरात स्टेजवर जाहीररीत्या त्यांनी माझा सत्कार केला. जणू मी म्हणजे कंपनीतला कुणी प्रमुख नटच होतो, असा उत्साह, असा समारंभाचा थाट ! माझ्यासारख्या एकाकी माणसालाही पेंढारकर कुटुंब, ' ललितकलादर्श '-विषयी अभिमान वाटतो तो या अशा वागणुकीमुळे.

खुद्द अण्णा तर मला वडीलकीचा मान देतातच, पण सौ. मालतीबाई पेंढारकरही मला मान देतात. त्यांची मुलं गिरिजा आणि ज्ञानेश माझ्यावर प्रेम करतात आणि म्हणून मीही त्या सार्‍यांना आपले मानले आहे. त्या सार्‍यांची सुखदुःखे माझी मानली आहेत.

अण्णांच्या स्वभावातली आपुलकी, जिव्हाळा, दिलदारवृत्ती तर थेट त्यांच्या वडिलांसारखी म्हणजे बापूंसारखी आहे. मी बापूंकडे जवळ जवळ दहा वर्षे काढली, पण त्या काळात त्यांनी मला एक दिवसही नोकरासारखे कधी वागवले नाही. बापूंच्या स्वभावातील वैशिष्ट्य म्हणजे ते अतिशय अबोल होते. अर्थात एकदा रागावले म्हणजे असे संतापत की विचारू नका, खोटयाची तर त्यांना अतोनात चीड होती. कंपनीतल्या नोकरांचे मन मात्र ते चांगल्या तर्‍हेने जाणत असत. कुणी काही मागण्यापूर्वीच त्याची अडचण ते दूर करीत. एकदा काय झाले, कुठल्या एका मुक्कामात आमच्या कंपनीच्या बिर्‍हाडासमोरच महाराष्ट्र नाटक मंडळीचा मुक्काम होता.

[ पृष्ठ ४४ वर ]





विविध भूमिकेत भालचंद्र पेंढारकर



छाया
के. टी. देशमुख
चित्रसंग्रह

आमची ललितकलादर्श [पान ४१ वरून]

तिथे कुणाला तरी कुत्रा चावला, ही बातमी बापूंना कशी कळली कोण जाणे ! पण ते सरळ उठले. त्या माणसाला आपल्या मोटारीत घालून त्यांनी सरकारी दवाखान्यात नेले. त्याच्यावर योग्य ते उपचार केले. वास्तविक, दुसऱ्याच्या कंपनीतला तो माणूस बापूंवर त्याची काही जबाबदारी नव्हती, तरीही त्यांनी त्या माणसासाठी कष्ट घेतले. का ? तर नाटक धंद्यातला कुणीही माणूस ते आपलाच मानीत, त्यासाठी शक्य ते सर्व काही करत असत म्हणूनच ! !"

बऱ्याच वेळा कंपनीतले नट कसलीही पूर्वसूचना न देता कंपनी सोडून जायची तयारी दाखवीत. अशा वेळी बापूंचा स्वाभिमानी स्वभाव उफाळून येई. ते त्या माणसाचा सर्व पगार, बाकी सारे काही त्या क्षणी पूर्ण करीत असत आणि त्याला जाण्याची वाट मोकळी करून देत. कंपनीतून त्याला अत्यंत सन्मानाने निरोप देत. पण एवढे नक्की की, त्याचे पाय धरून ते त्याच्या विनवण्या मात्र कधीही करीत नसत आणि नंतरही जर कधी ती व्यक्ती कंपनीत आली तर त्याचा अपमान तर करीत नसतच, पण त्याला अत्यंत प्रेमाने, आपुलकीने वागवीत. "तुझ्यामुळे माझे नुकसान झाले" असे ते कधी चुकूनही बोलत नसत. व्यक्त करून दाखवीत नसत. हा तोल फारच थोड्या कंपनीच्या मालकांजवळ असतो.

"बापूंच्या स्वाभिमानी स्वभावाप्रमाणेच अण्णांचा स्वभावही तसाच स्वाभिमानी ! त्याची एक आठवण सांगतो. कै. लोंढ्यांनी आपल्या कंपनीत बहुतेक सर्व कंपन्यांच्या मालकांना त्यांच्या आपत्काळी काम देऊन वरवर त्यांच्यावर उपकार केल्याचे दाखवून, वस्तुत: अपमानच केला होता. याचा लोंढ्यांना भारी अभिमान. ते म्हणत-देखील असत, "मी माझ्या कंपनीत सर्व कंपनीच्या मालकांना नोकर म्हणून नाचवीन ! " सुदैवाने नटसम्राट बालगंधर्व आणि आमचे अण्णा या दोनच मालकांनी, त्यांना पैशाची नितांत गरज असूनही लोंढ्यांकडे नोकर म्हणून काम केले नाही. अण्णांवर एकदा मोठा बिकट प्रसंग मात्र ओढवला होता, पण अण्णांनी आपला निर्धार कायम ठेवला. स्वाभिमान दाखविला. त्याचं असं झालं, लोंढ्यांची मुलगी एकदा कोल्हापूरला अचानक आजारी झाली त्यामुळे लोंढ्यांना कोल्हापूरला जाणे क्रमप्राप्तच होते. शिवाय इकडे मुंबईत 'सोन्याचा कळस' चा प्रयोग तर ठरलेला, अशा परिस्थितीत वेळ साजरी करण्यासाठी लोंढ्यांनी अण्णांना विठू-कृष्णाचे काम करण्याची विनंती केली. लोंढ्यांची अडचण लक्षात घेऊन अण्णांनी काम केले, वेळ साजरी केली, ही गोष्ट खरी असली तरी प्रयोगानंतर लोंढ्यांचा मॅनेजर जेव्हा अण्णांना नाईटचे पैसे देऊ लागला तेव्हा मात्र त्यांनी साफ नाकारले. ते म्हणाले, " लोंढ्यांना सांगा, मी नाटकांत काम केले ते तुमचा मित्र म्हणून, नोकर म्हणून नाही ! ! " पुढे लोंढे कोल्हापूरहून आले. त्यांनीही अण्णांना पैसे

घेण्याची विनंती केली, पण अण्णांचे उत्तर कायम ! वास्तविक त्या वेळी हाताशी आलेली लक्ष्मी, मग ती कितीही थोडी असो, सहजासहजी दूर सारावी अशी अण्णांची परिस्थिती नव्हती. पैशाची नितांत गरज, तरीही अण्णांनी एक पैही घेतली नाही. या प्रकारावर बोलताना लोंढयांनीसुद्धा कबुली दिली आहे, " बापूंचा मुलगा शोभतोस खरा ! "

आज अण्णा काय किंवा पूर्वी बापू काय ' ललितकलादर्श ' ही संस्था मोठी व्हावी म्हणून किती झटले आहेत हे मी माझ्या डोळयांनी पाहिले आहे. अनुभवले आहे. संस्थेचा लौकिक, कीर्ती यांपुढे दोघांनाही स्वहित, स्वार्थ कधी सुचलाच नाही. जे काय मिळवायचे, कमवायचे ते कंपनीची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी, हाच दोघांनाही ध्यास. मग आम्हा नोकरमंडळींनाही कंपनीबद्दल, मालकांबद्दल अभिमान वाटल्यास चुकले काय ? तुमचा विश्वास बसणार नाही पण आज माझ्या देव्हाऱ्यात बापूंचा, अण्णांचा फोटो आहे. बापूंच्या फोटोला हार घातल्याखेरीज माझा नित्यक्रम सुरूच होत नाही. म्हणून माझा तर निर्धार आहे, की जे काय आयुष्य उरलाय ते कंपनीच्या सेवेत घालवायचं, आणि मला विश्वास आहे की, मी कितीही थकलो तरी अण्णा मला कामावरून दूर करणार नाहीत. सध्या डोळयांचे ऑपरेशन झाल्यामुळे मी कामावर जाऊ शकत नाही पण माझे पैसे बिनचूकपणाने घरी पाठविले जातात. ही वागणूक खरोखरच दुर्मिळ.

□□



## नाटक धंदा कसा करावा याचे खरे शिक्षण मला मिळाले ते बापूंकडूनच.

### महादेव कृष्ण वेलणकर

१९३२ ते १९३७ या कालात ललितकलेच्या व्यवस्थापन विभागात काम केलेल्या महादेव कृष्ण वेलणकरांनी सांगितलेल्या आठवणी केवळ बापूंच्याच असल्या तरी ज्यांनी ' ललितकलादर्श ' मराठीला आणली त्या बापूराव पेंढारकरांच्या कर्तृत्वाचे यशापयशाचे मूल्यमापन त्यांच्याच एका सहकाऱ्याने करावे याचे महत्त्व फार मोठे आहे. वेलणकर म्हणाले, ' नाटककंपन्यांचा मॅनेजर म्हणून मी २५–३० वर्षे वेगवेगळया संस्थांतून काम केले. पण ' ललितकलेत सहा

वर्षांच्या काळात मला जे अनुभवायला मिळाले, शिकायला मिळाले ते अद्वितीय होते. हा धंदा कसा करावा याचे खरे शिक्षण मला मिळाले ते बापूंकडून !! आणि म्हणूनच मी बापूंना गुरुस्थानी मानतो !! इतर कंपनीच्या मालकांशी मी जेव्हा बापूंची तुलना करू लागतो, तेव्हा त्यांचा एक फार महत्त्वाचा गुण माझ्या लक्षात येतो तो म्हणजे, बापूंनी आपल्या कंपनीतील कुणाही माणसाला कधीही दुखावलेले नाही. सर्वांशी ते प्रेमळपणाने वागत, इतकेच नाही तर ' ललितकले 'चा नट, नोकर, हा लोकांच्या चर्चेचा विषय न व्हावा म्हणूनही अतिशय खबरदारी घेत. आपला माणूस मग तो कुणीही असो, तो सांभाळून घेण्याचे त्यांचे कसब मोठे उल्लेखनीय वाटते. '

' ललितकले 'त असताना संस्थेच्या प्रत्येक नाटकाबद्दलच्या प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया जवळून ऐकायची फार मोठी दुर्मिळ संधी मला लाभली. माझ्या लक्षात आले की ' ललितकले 'चा प्रेक्षक वर्ग हा मुख्यत्वे करून सुशिक्षित आणि दर्जेदार असे, कारण प्रेक्षकांना खात्रीच असे की, ' ललितकले ' चे नाटक म्हणजे उत्कृष्ट अभिनय, प्रेक्षणीय नेपथ्य, रेखीव प्रयोग या गोष्टींचा सुरेख मेळ हा असणारच !! कोणतेही नाटक असो त्यात भागवाभागवी, चुकारपणा तर कधीही दिसत नसे, यामुळेदेखील संस्थेवर प्रेक्षकांचे गाढ प्रेम व विश्वास असे.

'ललितकले'चे वैशिष्टच म्हणजे वेळेवर प्रयोग सुरू करणे ! या गोष्टीची पूर्वी आणि आजही भालचंद्र पेंढारकरांच्या आमदानीत इतकी ख्याती आहे, की तिसऱ्या घंटेबरोबर प्रेक्षकांनी घड्याळे लावून घ्यावीत असा लौकिक. पण हे वेळेचे बंधन पाळण्यासाठी बापूंनी काय केले नाही ? वाटेल ते कष्ट केले, झीज सोसली पण, वेळेवर नाटक सुरू करण्याची आपली प्रथा कधीही मोडली नाही. या संदर्भात नगरच्या एका प्रयोगाच्या वेळी त्यांनी केलेल्या धावपळीचा प्रसंग मला आजही स्पष्ट आठवतो. नगरला एक प्रयोग कॉन्ट्रॅक्टने दिला होता. वेळ होती रात्री ९ वाजता, त्या दिवसांत बापू चित्रपटाच्या शूटिंगमध्ये गर्क असल्यामुळे दिवसभर शूटिंग करायचे आणि रात्री नाटक असा खाक्या चालू होता. नगरच्या प्रयोगाला ते असेच शूटिंग आटोपून येणार होते. पण ८।। वाजले तरी बापूंचा पत्ता नाही. कॉन्ट्रॅक्टर घाबरला, आता नाटक काही वेळेवर सुरू होत नाही, असे त्याला वाटू लागले; पण मला खात्री होती की बापू येणार, पण घड्याळ जसे मिनिटा-मिनिटाने पुढे सरकू लागले तसा माझाही धीर सुटला. अखेर पावणेनऊ झाले. बापूंचा पत्ता नाही. काय करावे या फिकीरीत असतानाच बापूंची गाडी थिएटरच्या आवारात येऊन धडकली. गाडीतून उतरून अक्षरश: पळत ते मेकअपरूमकडे गेले आणि मला म्हणाले, "चला दुसरी घंटा द्या," आणि काय सांगू, प्रयोग ठीक नऊच्या ठोक्याला सुरू झाला ! नाटकाची वेळ साधण्यासाठी जिवाचा इतका आटापिटा करणारे मालक माझ्या तरी पाहण्यात दुसरे कुणी नाहीत.

नाटक कंपनी चालवायची म्हणजे मालकांना किती यातना, त्रास भोगावा लागतो

याचा अनुभव शब्दांत व्यक्त करणे कठीण आहे. कितीही मनस्ताप झाला तरी मालकांनी चेहरा शांत प्रसन्न ठेवावा लागतो, हे तर फारच कठीण! बापूंच्या अंगी हा दुर्मिळ गुण होता. ते कितीही रागावले तरी वर तसे क्वचितच दिसत असे. रागाच्या भरात त्यांनी कुणाचा अपमान केल्याचेही माझ्या पाहण्यात नाही. नाहीतर इतर कंपन्यांचे मालक पाहा, नोकरांना आणि प्रमुख नटांना-सुद्धा किती अद्वातद्वा बोलतात! कंपनीचा मालक व्यसनी असायचा हेही बऱ्याच वेळा दिसून येते. बापू मात्र कोणत्याही व्यसनापासून अलिप्त होते. व्यसनापासून दूर असलेले जे काय चार-पाचच मालक मी पाहिले, त्यांत बापूंचा अग्रक्रम होता.

दुसरे म्हणजे बापू स्वतः कंपनीची कोणतीही गोष्ट खाजगी उपयोगा-साठी आणायचे नाहीत. वास्तविक ते कंपनीचे मालक, प्रत्येक गोष्टीवर त्यांचा हक्क, पण त्यांनी हा नियम काटेकोरपणाने पाळला. आता गाडी-चीच गोष्ट घ्या, कंपनीची गाडी ही कंपनीच्या कामासाठीच उपयोगात येत असे, त्या गाडीतून बापूंची आई, पत्नी, मुले, मौजमजा करायला गेल्याचे मी तरी कधीही पाहिलेले नाही.

बापूंच्या स्वभावातील एक मह-त्त्वाचा गुण म्हणजे कंपनीची प्रतिष्ठा, आब नष्ट न व्हावा या दृष्टीने, त्यांनी केलेली धडपड. ते उभे होते

## जेवणाचे ताट

'ललितकादर्श' मध्ये गेली काही वर्षे काम करणारे एक कलावंत श्री. आ. दे. पाटील यांनी भालचंद्र पेंढारकरांच्या आगत्यशील स्वभावाची सांगितलेली आठवण उल्लेखनीय आहे. पेंढारकरांचा एक नियम आहे. दौऱ्यात असले म्हणजे कंपनीतला प्रत्येक माणूस बरोबर घेऊ-नच जेवायला बसायचे! एकदा अशाच एका दौऱ्यावर काही कारणाने पाटील रुसले आणि संतापाच्या भरात त्यांनी ठरविले, की मुंबईला परत निघून जायचं. या वेळी कंपनीतले सारे लोक स्टेशनवर एका प्रवासी डब्यात होते. पाटील यांनी तिथून आपले बेडिंग उच-लले आणि स्टेशनवर मुंबईला जाणाऱ्या दुसऱ्या गाडीत जाऊन बसले. थोड्या वेळाने जेवणाची वेळ झाली. सारी मंडळी स्टेशनवरच्या कँटीनमध्ये जेवा-यला गेली. फक्त पाटलांचा पत्ता नाही. लगेच पेंढारकर एक ताट हातात घेऊन निघाले आणि मुंबईच्या गाडीत पाट-लांना शोधू लागले. एका डब्यात पाटील संतापाने फणफणत असलेले त्यांना दिसले. पेंढारकर पाटलांजवळ गेले आणि म्हणाले, "पाटील, अहो तुम्हांला रागवायचे असेल तर रागवा, पण आधी जेऊन घ्या पाहू. तुमचं जेवण झाल्यावरच मी जेवणार आहे." पेंढारकर स्वतः ताट घेऊन आपल्या शोधार्थ आले हे पाहताच पाटील राग विसरले आणि सरळ उठून सामान घेऊन कँटीनमध्ये जेवायला गेले.

—आ. दे. पाटील—

तोवर त्यांनी अखरच्या क्षणापयत धडपड केली. कंपनीच्या कठीण काळात त्यांच्या जागी दुसरा कोणी असता तर अंग झटकून मोकळा झाला असता. पण बापूंनी तसे कधीही केले नाही. सर्वस्व पणाला लावून कंपनी चालू ठेवली. ग्वाल्हेरला कंपनी बंद पडली तेव्हा बापू अंथरुणावर पडून होते म्हणूनच तो दुर्दिन ओढवला. एरव्ही बापूंनी काय वाटेल ते केले असते पण कंपनी चालू ठेवली असती. तसं पाहिलं तर यापूर्वीही कंपनी पैशाच्या फिकिरीत अनेक वेळा पडली होती. अगदी ऐन मध्यरात्री पैशाची जरुरी भासे त्या वेळीही बापूंनी या कानाचे त्या कानाला कळू न देता पैशाची सोय केली होती. ते बापू कंपनी बंद करू देतील हे कसे शक्य होते ? पण शेवटी अगदीच नाइलाजच झाला.

बापूंचा स्वभाव अतिशय हट्टी होता. त्याचाही त्रास त्यांना अखेरच्या काळात फार झाला. त्यांनी चित्रपट काढायचा ठरविले आणि त्यासाठी फार कष्ट घेतले. त्याचा ताण पडला, तब्येत ढासळली. बरं हे सांगायची सोय नाही. स्वभाव मोठा जिद्दी, हाती घेतलेली गोष्ट वाटेल ते करून पुरी करायचीच हेच ध्येय ! चित्रपट आणि नाटक या दोनही गोष्टी एकदम सर्वस्वपणाला लावून करायला गेले इथेच चुकले. सिनेमा सोडून केवळ नाटक कंपनीच चालविली असती तर मला नाही वाटत बापूंचा अंत इतक्या लवकर झाला असता ! □□



**आण्णा कसून मेहनत करतील तर आदर्श नाट्यसंगीताचा नमुना ते रसिकांसमोर ठेवू शकतील......**

**गोविंद पटवर्धन**

' ललितकलादर्श' ही संगीत नाटक मंडळी. तेव्हा त्यात गायक कलाकारांइतकेच साथीदारांचे महत्त्व. या बाबतीतले काही अनुभव ' ललितकले 'त गेली १२ वर्षे ऑर्गनची साथ करणाऱ्या श्री. गोविंद पटवर्धन यांनी सांगितले. ते म्हणाले, ' मंबई मराठी साहित्य संघा 'च्या ' होनाजी बाळा 'त मी ऑर्गनची साथ करीत होतो, तेव्हापासून माझी आणि भालचंद्र पेंढारकरांची ओळख ! माझी साथ अण्णांना आवडली आणि तेव्हापासून आजतागायत म्हणजे १९५६ सालापासून, मी ' ललितकले 'चा ऑर्गनवादक आहे.

एक गायक नट या दृष्टीने पेंढारकरांचे काही दुर्मिळ गुण व्यक्त करताना श्री. पटवर्धन पुढे म्हणाले, " साथीची मजा घेऊन त्यात रंगून जाऊन गाणारे जे काही थोडे गायक कलाकार आज आहेत त्यांत पेंढारकरांचा नंबर वरचा आहे. स्टेजवर असले आणि साथीदाराने एखादी चांगली जागा घेतली तर ' वाऽवी ' साद दिल्या-खेरीज ते कधीच राहणार नाहीत. त्यामुळे साथीदाराला त्यांची साथ करायला फार आनंद होतो. पेंढारकरांचा आवाज मात्र कोड्यात टाकणारा आहे. कारण आवाज गोड म्हणावा तर तसा नाही. उलट त्यात बिघाडच झालेला अधिक दिसतो. पण म्हणून गाणे चोरून म्हटल्याचे माझ्यातरी आठवणीत नाही. त्यांच्या आवाजाची गंमत अशी, की आवाज बिघडला की ते जास्तीत जास्त उंच लावतात आणि मगच त्यांचा आवाज सुटतो. हा अनुभव मी कितीतरी वेळा घेतला आहे. त्यांचा आवाज बिघडतो तेव्हा बऱ्याच वेळा मला काळजी वाटते. पण ते गायला उभे राहिले म्हणजे लटपट चालत नाही. स्वच्छ, स्पष्ट, शब्दोच्चार हे त्यांच्या गाण्यातले मोठे वैशिष्टच आणि म्हणूनही त्यांचे गाणे इतर कुणाहीपेक्षा वेगळे ठरते, आकर्षक ठरते, लोकप्रिय ठरते. तालासुरांचे अंग तर त्यांना फारच चांगले आहे. वझेबुवांची गायकी त्यांनी आत्मसात केलेली आहे त्याचा उपयोग त्यांना फार चांगला होतो. ही गान-पद्धती खेड्यापाड्यापर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी मोठ्या उत्कृष्टपणाने केलेले आहे.

अण्णांचा आवाज वारंवार बिघडतो त्याला कारणेही तशीच आहेत. आवाजावर मेहनत करायला त्यांना पुरेसा वेळच मिळत नाही. सदोदित काही ना काही तरी नव्या उद्योगात गर्क असतात. मला नेहमी वाटते, अण्णा जर कसून मेहनत करतील तर आदर्श नाट्य संगीताचा नमुना ते रसिकांपुढे ठेवू शकतील. तेवढी कुवत त्यांच्या-जवळ खात्रीने आहे.

आता कंपनीचा मालक या नात्याने त्यांच्याजवळ एक फार चांगला गुण आहे. तो म्हणजे सहसा आपल्याकडील कलावंत ते बाहेर जाऊ देणार नाहीत. प्रत्येक क्षेत्रातला चांगला गुणी माणूस निवडून ते घेतात आणि एकदा घेतला, की त्या माणसासाठी काय वाटेल ती झीज सोसतील, पण आपणहून त्याला घालवून मात्र देणार नाहीत. कंपनीच्या हितासाठी कलावंताच्या लहानशा चुकीकडे, दोषाकडे दुर्लक्ष करण्याचा मनाचा मोठेपणाही त्यांच्या जवळ आहे. माझ्या बाबतीतलाच अनु-भव सांगतो. एकदा माझ्या हातून फार मोठी चूक घडली, मी माझी जबाबदारीच विसरलो होतो म्हणा ना. त्याचं असं झालं, एक दिवस सकाळी बिर्ला मातुश्री सभा-गृहात ' पंडितराज 'चा प्रयोग होता. मला या नाटकात पहिल्या अंकानंतर एकदम तिसऱ्या अंकात " जयगंगे " च्या वेळी काम असते. मधला वेळ आम्ही इकडे तिकडे हिंडून घालवितो पण गाण्याच्या वेळेला मात्र नेमके ऑर्गनजवळ यायचे हा आमचा शिरस्ता ! त्या प्रयोगाच्या वेळी माझ्या हातून त्याचाच मोड झाला होता

त्या दिवशी काय झालं कळेना, मला सडकून भूक लागली. मध्यंतरात वेळ होता म्हणून मी थिएटरशेजारील एका हॉटेलात खायला गेलो. मित्रमंडळी बरोबर होती. त्यामुळे वेळ कसा गेला कळलं नाही. आठवण झाली तेव्हा लक्षात आलं, की भजन तर संपायची वेळ आली, आता काय करणार ? थिएटरकडे धाव घेतली, मी थिएटरमध्ये प्रवेश केला तेव्हा सावकार पद संपवीत होते. मी ऑर्गनवर नाही असे पाहून स्वत: अण्णांनी आतून ऑर्गनची साथ केली होती. माझी जबाबदारी विसरल्यामुळे मी चांगलाच खजील झालो होतो. वाटलं होतं आता अण्णा खूप रागवणार, आणि त्यांचं तरी काय चुकणार होते ? त्याच अपराधी अवस्थेत तिसऱ्या अंकानंतर मी आत गेलो. अण्णांकडून अपेक्षित राग तर व्यक्त झाला नाहीच, उलट नेहमीच्या पद्धतीने ते हसून खेळून बोलले. माझा पश्चात्ताप त्यांनी ओळखला होता हे निश्चित !! आणि म्हणूनही गप्प बसले असावेत. वास्तविक सर्वांसमोर माझा अपमान करायची, केवढी संधी चालून आली होती. पण ते घडले नाही. मग पुढे महिनाभराने कधीतरी विषय निघाला तेव्हा खाजगीरीत्या मला त्या प्रकाराबद्दल विचारले, बस्स त्यानंतर त्याचे नाव नाही.

हेच अण्णा कंपनीतील कुणावर संकट आले म्हणजे त्याच्या मदतीला अगदी न


आगामी प्रकाशन

# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

बोलावताही हजर राहतात. या बाबतीतही मला अनुभव आहे. मी सरकारी नोकरी करतो. ती सांभाळून मी नाटकाची साथ करतो. याबद्दल माझ्याबद्दल वरिष्ठांकडे तक्रारी गेल्या, लगेच चौकशीला सुरुवातही झाली. मी फिकिरीत पडलो. या वेळी अण्णा आपणहून माझ्या वरिष्ठांना भेटले. माझी बाजू सांभाळून घेतली, वास्तविक त्यांना काय जरुरी होती ? माझ्यासारखे छप्पन्न साथीदार मिळतील, पण नाही, " गोविंदा आपला आहे, त्याच्या मदतीला जाणे आपले कर्तव्य आहे " ही जाण त्यांना चांगली आहे. या घटनेची आठवण झाली की अजूनही मला भडभडून येते.

□□



## आजही कधी एखादा प्रयोग नुकसानीत गेला तरी ' तुम्ही नाईट कमी घ्या ' असे शब्द ऐकायला मिळत नाहीत.

### दामुअण्णा पार्सेकर

' ललितकलादर्श 'मध्ये १९४२ सालापासून तबलजी म्हणून काम करीत असलेल्या श्री. दामुअण्णा पार्सेकरांनाही आपण ' ललितकले 'चे साथीदार आहोत या गोष्टीचा विलक्षण अभिमान ! ते म्हणतात, " कलाकारांची बूज राखणारी ही एकमेव नाट्यसंस्था म्हणून मी तिचा निःसंकोचपणाने उल्लेख करीन. बापूंच्या काळात तर हा विशेष सांभाळला गेलाच पण आज अण्णाही तितक्याच जिद्दीने, त्याच ध्येयाने वागत आहेत.

नाटक कंपनी म्हटली म्हणजे कलावंतांना बहुतेक वेळा पैशाची अशाश्वती वाटत असते पण ' ललितकलादर्श ' ही एक संस्था अशी आहे, की इथे काम करणाऱ्या कलावंताला आपली एक पैदेखील बुडणार नाही याची खात्री असते. असा हा विश्वास मिळविणे फार दुर्मिळ असते. अण्णांनी जेव्हा कंपनी पुन्हा सुरू केली, तेव्हा आरंभीची काही वर्षे ते अत्यंत नुकसानीत प्रयोग करीत असत. संस्थेचे होणारे नुकसान आम्हा लोकांना स्पष्ट दिसत होते. पण आपली नाईट आता बुडणार असे कुणाला कधी स्वप्नातही वाटत नसे. आजही कधी एखादा

प्रयोग नुकसानीत गेला तरी "तुम्ही नाईट थोडी कमी घ्या" असे ऐकायला मिळत नाही. ज्याचे जे मानधन ते बिनचूक पोहोचते होणार हे मुळी ठरलेलेच ! !

खुद्द अण्णांच्या प्रेमळ स्वभावाबद्दल, कंपनीचा एक मालक म्हणून त्यांच्या वागणुकीबद्दल कुणालाही वाईट बोलता येणार नाही. सर्वांशी सारख्याच जिव्हाळ्याने व आपलेपणाने ते बोलतात. साथीदारांना तर किती सांभाळून घेतात म्हणून सांगू ? आपण कंपनीचे मालक. आपण गाऊ तशा पद्धतीनेच साथीदाराने वाजविले पाहिजे असे कधीही म्हणणार नाहीत. उलट प्रसंगी आम्हा साथीदारांचा सल्ला घेतात. आम्हांला योग्य तो मानही देतात. नाटकाव्यतिरिक्त अण्णा कधी कधी गाण्याच्या बैठकी करतात. अशा वेळी प्रथम आम्हांला विचारून, आमच्या वेळा सांभाळून मगच कार्यक्रम घेतात. आम्ही नसलो तर ते कार्यक्रम घेणार नाहीत हे आम्हांला पूर्ण माहीत असल्याने आम्हीही प्रथम त्यांच्याकडे जाणे पसंत करतो. कारण पशाला चोख, वागवणूक उत्तम !

मी गेली वीस वर्षे त्यांची साथ करतो आहे पण या काळात त्यांच्या स्नेहशील, प्रमळ स्वभावात, साध्या पोषाखात जसा फरक पडलेला नाही त्याचप्रमाणे त्यांच्या गाण्याच्या पट्टीतही फरक नाही. पांढरी चार ही त्यांची पट्टी. त्यातच आजवर सतत गात आहेत. गाण्यात अंगचुकारपणाही केलेला आढळत नाही. एकदा त्यांच्या गाण्याची बैठक अगदी पहाटेपर्यंत चालली होती. ते असे कसून गायले की आवाज साफ बसला. मला काळजी वाटू लागली, कारण सकाळी नाटकाचा प्रयोग होता. त्यात अण्णा आता गाणार तरी कसे हाच प्रश्न पडला. पण तशाही परिस्थितीत नाटक सुरू झाले आणि गंमत अशी की नाटक सुरू होताच त्यांचा आवाज सुटला. जणू त्यांची जिद्द पाहून नटराज त्यांच्यावर प्रसन्न झाला असे वाटते. आवाज बसला आहे अशी सबब सांगून त्यांनी आजपर्यंत कोणतेही नाटक बंद केल्याचे माझ्या स्मरणात नाही. ◻◻


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

## प्रयोगाची वेळ संभाळण्यासाठी संस्थेच्या कलाकारांना विमानाने नेणारे अण्णा हे पहिलेच मालक असतील.

### लीला मेहता

'ललितकलादर्श'मध्ये गेली काही वर्षे काम करीत असलेल्या लीला मेहता यांनी पेंढारकरांच्या स्वभावातले सांगितलेले काही विशेष, उल्लेखनीय आहेत. त्या म्हणाल्या, " कंपनीतल्या कलावंतांना किती मानपान द्यायचा हे अण्णांना जितके कळते तितके अन्य कंपन्यांच्या मालकांना क्वचितच कळत असेल. कलाकारांशी प्रेमाची, आपुलकीची वागणूक ही तर अण्णांची स्पेशॅलिटी आहे. ते स्वत: एक कलावंत असल्याने संस्थेकडून कलावंतांच्या किमान अपेक्षा काय, ह्या गोष्टीची त्यांना पूर्ण जाणीव आहे आणि म्हणूनही कंपनीत काम करणाऱ्या कोणाही कलावंताचा स्वाभिमान दुखावेल असे वर्तन त्यांच्या हातून घडत नाही. या वैशिष्टयामुळे एकदा 'ललितकले'त काम करायला लागलेला कलावंत प्रथम 'ललितकले'च्या तारखा घेऊन मग इतरांच्या तारखा घेतो. हे भाग्य किती नाटय-संस्थांना मिळते ?

कंपनीचा दौरा म्हटला म्हणजे तर कलाकारांचा आनंद द्विगुणित होतो. कलावंतांची बडदास्त काय वर्णन करावी. जणू माहेरवाशिणीचे कौतुक व्हावे असा सारा थाट ! ! प्रत्येकाच्या बारीकसारीक आवडी कसोशीने, कटाक्षाने पूर्ण केल्या जातात. त्या पूर्ण करण्यासाठी अण्णा काय वाटेल ती धडपड करतात. मला मांसाहार आवडतो हे त्यांना माहीत आहे. त्यामुळे दौऱ्यावर असलो म्हणजे २–३ दिवस झाले की, त्या गावातील उत्तम हॉटेलमधून माझ्या आवडीचे पदार्थ मागवायला ते विसरत नाहीत. माझेच कशाला सर्वांनाच अशी वागणूक मिळते. मग सांगा, कुणाला संस्थेबद्दल आदर वाटणार नाही ?

बहुतेक सर्व नाटक कंपन्यांची पद्धत अशी असते की, दौऱ्यावर जायचे म्हणजे कलावंतांना त्या गावी घेऊन जायचे, त्यांच्या राहण्या-जेवणाची व्यवस्था करायची. बस्स

एवढेच ! 'ललितकले'च्या दौऱ्यात यापेक्षा बरेच काही वेगळे असते. इथली व्यवस्था उत्तम असते हे तर खरेच, पण ज्या ज्या नवीन गावी जाऊ तिथली प्रेक्षणीय स्थळे कंपनीच्या खर्चाने नटांना दाखविण्याची व्यवस्था होते. कलावंतासाठी एवढे कोण करतो ? पण आपल्या कलावंतांनी एका विशिष्ट दर्जाने, मानाने राहावे ही अण्णांची इच्छा, त्यातूनच ह्या साऱ्या गोष्टी घडतात.

कंपनीतल्या कलावंताचा मान कसा सांभाळला जातो, ह्याची आठवण सांगते. एकदा आम्ही अहमदाबादला गेलो होतो. तिथे ज्या हॉटेलमध्ये उतरलो होतो, तिथली पद्धत अशी की, पॅसेंजरने चहा मागितला की, चहा देताना आधी रोख पैसे घ्यायचे ! ही गोष्ट आम्हा कुणालाच माहीत नव्हती. हॉटेलमध्ये मुक्काम पडताच कुणी चहा, कुणी कॉफी, कुणी दूध मागवले. वेटरने प्रत्येकाची मागणी पुरी केली. पण चहाच्या कपाबरोबरच वेटरचा हात पैशासाठी पुढे पसरत असे. आम्हा साऱ्यांनाच अवघडल्यासारखे झाले. कारण दौऱ्यात चहाचे पैसे नटांना द्यावे लागतात, हा अनुभव प्रथमच येत होता. कुणी तरी ही गोष्ट अण्णांना कळविली. अण्णा जे भडकले ते थेट मॅनेजरकडे गेले आणि त्याच्यापुढे डिपॉझिट म्हणून काही नोटा ठेवून म्हणाले, " हे पाहा, पॅसेंजरकडून चहाचे पैसे रोख घेण्याची तुमची पद्धत असेल, पण म्हणून हा नियम माझ्या कंपनीतल्या लोकांना लावायचा नाही. हे आगाऊ पैसे !!" नंतर हा पैसे मागण्याचा प्रकार घडला नाही हे सांगायलाच नको.

'ललितकले'च्या कलावंताला पैशाचीही कधी काळजी वाटत नाही. एखाद्या प्रयोगाला उत्पन्न कमी झाले म्हणून नाईट कमी घ्या, अशी वृत्ती तर नाहीच उलट प्रत्येकाची नाईट चोख मिळणार हे ठरलेलेच असते. मध्यंतरी मी आजारी होते. तेव्हा माझ्याऐवजी माझ्या बहिणीने काम केले त्या वेळी तिला नाईट तर मिळालीच पण माझी नाईटही घरी पोहोचती झाली.

'ललितकले'चे एक वैशिष्टय म्हणजे वेळच्या वेळी नाटक सुरू करणे, ह्यासाठी अण्णा काय करीत नाहीत ? नाना खटपटी करतात, त्रास घेतात, त्या आठवणी सांगत बसले तर पानेच्या पाने पुरणार नाहीत. पण भारत–दौऱ्यातला एक अनुभव अगदी सांगायलाच पाहिजे असा आहे. भारत-दौऱ्यात एक दिवस आमचा प्रयोग बंगलोरला होता. वेळ सायंकाळी ६॥ ची होती. पेंढारकरांच्या आरंभीच्या प्लॅनप्रमाणे जर रेल्वेची सोय व्यवस्थित झाली असती तर आम्ही बंगलोरला अगदी वेळेवर पोहोचू शकत होतो. पण रेल्वेच्या गैरकारभारामुळे एक प्रसंग असा ओढवला की, आम्ही काही बंगलोरला वेळेवर पोहोचणार नाही अशी चिन्हे दिसू लागली. अण्णांनी काय करावे ? चक्क सर्व कलावंतांना विमानात घातले, रेल्वे तिकिटाच्या किती तरी पट अधिक पैसे खर्च केले, पण प्रयोग वेळच्या वेळी सुरू केला. मला वाटतं, प्रयोगाची वेळ सांभाळण्यासाठी कलाकारांना विमानाने नेणारे अण्णा हे एकमेव मालक असतील. ○

शरद गोखले

# बारा वर्षे सहा महिने तीन दिवस

कथानक : गुन्ह्याचा तपास करण्यासाठी निघालेल्या पोलीस तुकडीला मार्ग दाखविणारे पाटील लांबच्या मार्गाने जाऊ लागतात. परंतु पोलिस इन्स्पेक्टर जवळच्या भुताच्या दरीतून जाणे पसंत करतात. दरीच्या टोकाला हाडांचा सापळा असलेली मोठी ट्रंक सापडते.

सापळा ठेवलेली ट्रंक, आणि सापळ्याच्या गळ्यातील सोनेरी लॉकेटमध्ये सापडलेला फोटो. त्यांच्या आधारे पोलीस तपास सुरू होतो. धागेदोरे जुळू लागतात आणि एका तमाशा फडासंबंधी पोलिसांना संशय येऊ लागतो. पोलिसांची मंडळी तमाशात घुसतात. आणि प्रकरण हळू हळू उलगडू लागते. शेवंती नावाच्या नाचणारणीवर शहापूरचे धनाढ्य इनामदार बेहद्द खूष असतात. पैशाच्या लोभाने इनामदारांचे धाकटे बंधू बाईच्याच माडीवर मारेकरी घालून इनामदारांचा खून करवतात. मारेकरी मुद्‌गल व शेवंती यांची जवळीक होते. खुनाच्या रात्री इनामदारांची छोटी छोकरी आशा तेथेच असते. मुद्‌गल व शेवंती आशाचे नाव बदलून तिला वाढवतात. वयात आलेली 'रत्ना' बोर्डावर उभी राहते. लॉकेटच्या आधाराने रत्नाच्या फडाभोवती असलेले पोलीस १२ वर्षांपूर्वी झालेल्या इनामदारांच्या खुनाचा तपास सुरू करतात. सावध झालेला खुनी शेवंतीचा व शेवटी मुद्‌गलचाही खून करतो. पण या वेळपर्यंत पोलिसांचे जाळे पूर्ण पसरले जाऊन खुनी पोलिसांच्या हातात पडतो.

**समीक्षण** : रहस्य जास्तीत जास्त काळ राखून ठेवण्यात रहस्यमय चित्रपटाचे यश अवलंबून असते. त्या दृष्टीने कथा, पटकथा व संवाद लिहिणाऱ्या ना. ग. करमरकर यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. रहस्याची गुंतागुंत वाढवत नेऊन अखेरच्या बिन्दूवर रहस्यस्फोट करण्यात ते यशस्वी झाले आहेत. मराठी चित्रपटाला आर्थिक यश देण्याच्या दृष्टीने 'तमाशा' हमखास उपयोगी पडतो. करमरकरांनी

आपले कथासूत्र तमाशाभोवती गुंफून आर्थिक यशाकडे झुकते माप ठेवले आहे. इनामदारांचा खून होतो त्यावेळी 'आशा' फार फार लहान दाखवली आहे. या छोट्या भूमिकेसाठी वयाने जरा मोठी कलावंत (सुमारे सात वर्षांची) निवडली असती तर बारा वर्षाच्या अंतरानंतर दाखवलेल्या रत्नाचे वय अधिक वास्तव ठरले असते. चित्रपटाचा उद्देश साधे-सरळ तमाशाप्रधान रहस्य-चित्र सादर करण्याचा आहे. हा मर्यादित हेतू चांगल्या प्रकारे यशस्वी झाला आहे.

दिग्दर्शक वसंत पेन्टर यांनी कथासूत्र पुष्कळशा तर्कशुद्ध पद्धतीने सादर केले आहे. त्यांची कलाकारांची निवडही चोखंदळ आहे. रत्नमाला (शेवंती) आणि उमा (रत्ना-आशा) या खरोखरीच मायलेकी वाटतात, आणि प्रेक्षकांच्या मनात ही कल्पना चांगली रुजावी अशी दक्षता त्यांनी सहेतुक घेतली आहे. मराठी चित्रपटांची 'कॉंपोझिशन्स' स्टेजी असतात, त्यामुळे आपण चित्रीत केलेले नाटक पाहत आहोत असे सतत जाणवत असते. मराठी चित्रपटांचा हा 'स्टेजी' भाव टाळण्याचा पेन्टरांनी अनेक ठिकाणी प्रयत्न केला आहे. नृत्यांच्या चित्रीकरणाचा दर्जाही समाधानकारक आहे. छायाचित्रकार अरविन्द लाड आणि नीलकंठ यांची कामगिरी समाधानकारक आहे. चित्रपटाच्या मूडला साजेसे लायटिंग देण्याचा लाड यांचा प्रयत्न लक्षात येत होता. सूर्यकांत (मुरारी पाटील—इन्स्पेक्टर प्रकाश) उमाला रिक्षातून घरी सोडतो, त्या वेळचा 'सूर्यकांत—उमा'चा एक कॉंपोझिट शॉट चांगल्या प्रकारे घेतला आहे.

उमाची नृत्ये हे या चित्रपटाचे प्रमुख आकर्षण. आवश्यक. त्या दृष्टीने कथाप्रवाहात खंड येत असूनही ही नृत्ये व त्याबरोबरची गीते प्रेक्षकांना हवीहवीशी वाटावीत अशा कौशल्याने चित्रीत करण्यात आली आहेत. अपवाद फक्त जयमाला काळेच्या नृत्याचा. तसेच 'ही रूपसंपदा वाहु कुणा' या गीताचे पहिले चित्रीकरण हास्यास्पद झाले आहे.

चित्रपटाचे संगीत-दिग्दर्शन लक्ष्मण बेरळेकर यांनी केले आहे. चाली बांधण्याचे काम त्यांनी पुष्कळच समाधानकारक केले असले, तरी पार्श्वसंगीताच्या बाबतीत काही प्रसंगी संगीत केवळ, पार्श्व न राहता अकारण प्रभावी बनते व पडद्यावरील दृश्यांना गौणत्व प्राप्त होते. खेबुडकरांची लेखणी आता काव्यलेखनात चांगलीच रुळल्याचे जाणवते.

**अभिनय :** बहुतेक सर्व कलावंतांना साजेशा भूमिका मिळाल्याने अभिनयाचा सर्वसाधारण दर्जा चांगला आहे. सूर्यकांत विविध प्रकारच्या वेषात सफाईने वावरतात. उमा व रत्नमाला या दोघींच्या भूमिका हे चित्रपटाचे आकर्षण ठरावे इतक्या चांगल्या आहेत. राजशेखर दिसतात व्हिलन पण, संवाद बोलण्याची पद्धत नाटकी आहे. छोट्या भूमिकेतून जोग व विवेक चमकून जातात.

**दर्जा :**— समाधानकारक. ○

# भावना हेलावणारी दोन रशियन चित्रे

## सेर्योझा
## □
## आल्प्सचे प्रेमगीत

अनिल हवालदार

सेर्योझा नावाचा एक छोटा मुलगा. त्याचे वडील वारलेले आहेत. त्याची आई दुसरे लग्न करते. सेर्योझाचे सावत्र वडील स्वभावाने चांगले आहेत. त्यांच्या बालसुलभ इच्छा–आकांक्षा ते समजावून घेतात–पुऱ्या करतात. तथाकथित ताण कथेमध्ये कुठेच येत नाही. सेर्योझाला एक सावत्र भाऊ मिळतो. तरीही त्याच्या आईबापाचे त्याच्यावर प्रेम आहे. एक दिवस वडलांची बदली दूरच्या निर्जन प्रदेशांत होते. सेर्योझा आजारातून नुकताच उठला असल्यानं त्याला तिथं नेणं इष्ट नसतं. तो हिरमुसला होऊन पाहत असतो. सगळ्यांच्या अंतःकरणात कालवाकालव होते. बर्फाचे वादळ चाललंय. सामान भरून गाडी तयार आहे. इंजिन घरघरते आणि सेर्योझाचे वडील एकदम ओरडतात– 'चल सेर्योझा ! आमच्याबरोबर चल !'

वेरा पानोवा या लेखिकेची ही अत्यंत साधी लघुकथा तशाच साधेपणाने जॉर्जी दानोलिया व इगोट तालान्किन यांनी पडद्यावर सादर केली आहे. कॅमेऱ्याचा प्रभावी वापर, दिग्दर्शकांचा बालमनोवृत्तींचा सखोल अभ्यास आणि सर्जेई बोंदारचुक, इरिना स्कोब्झेवा यांच्यासारखे कसलेले कलाकार यांच्यामुळे 'सेर्योझा' हा चित्रपट मुंबईतल्या सोविएत चित्रपट महोत्सवात प्रामुख्याने लक्षात राहिला. सेर्योझाचे काम करणारा बोर्या बाखातोव याचा चेहरा तर चित्रपट संपल्यानंतरही नजरेसमोरून हलत नाही. एका छोट्या मुलाच्या नजरेतून मोठ्यांच्या जगाचे



लक्षात राहणारा बोर्या बाखातोव

दर्शन घडविण्याचा कॅमेऱ्याचा प्रयत्न लक्षणीय आहे. सतत खालच्या कोनामधून घडवलेली विशिष्ट दृश्ये चित्रपटाच्या अभ्यासकांनी टिपण्यासारखी आहेत. नर्मविनोदी शैलीतून सबंध चित्रकथा सांगता सांगता अखेरचा प्रसंग भावना हेलावून टाकण्याचे करून जॉर्जी दानोलिया आणि इगोट तालान्किन या दिग्दर्शकद्वयाने दाखवले आहे. कान्स येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात पारितोषिके मिळवणारा हा यथार्थ बालचित्रपट आपल्या मराठी आणि हिंदी बालचित्रपट दिग्दर्शकांनी पाहिला तर किती बरे होईल !

## आल्प्सचे प्रेमगीत

उत्कट प्रेमाच्या एका विशिष्ट घटकेचे चित्रण म्हणजेच 'आल्प्सचे प्रेमगीत !' दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर आधारलेली आल्प्सच्या परिसरातील ही प्रेमकथा बोरिस स्टेपानावे यांच्या चित्रपट माध्यमावरच्या प्रभुत्वाचा दाखला आहे.

नात्सींच्या कैदेतून पळालेला एक रशियन सैनिक आणि इटालियन तरुणी आल्प्सच्या पर्वतराजीत भेटतात. जिवाच्या आकांताने ती दोघे प्राण वाचविण्यासाठी धडपडतात. त्यांना एकमेकांची भाषा नीट समजत नाही. अत्यंत तापलेल्या मन:स्थितीत ती दोघे जवळ येतात. स्पर्श बोलके होतात—ओठ एकमेकांना भिडतात आणि कॅमेरा हळुवारपणे फुलांच्या राशींवरून तरंगत जाताना दिसतो. मीलनाची उत्कटता अनुभवीत असताना नात्सी सैनिकांच्या कुत्र्यांचा आवाज ऐकू येतो. पुन्हा जीवघेणी पळापळ होते. या वेळी इवान थकतो. शेवटच्या क्षणी तो जुलियाला

हिमराशींवरून ढकलून देतो. जुलियाचे प्राण वाचतात आणि कुत्र्यांच्या उड्यांनंतर हिमकणांची उधळण इयानचे मरण सूचित करते.

अवघ्या दोनच व्यक्तिरेखा या चित्रपटात रेखल्या आहेत. त्यांची मानसिक आंदोलने, त्यांना प्रथम वाटणारा दुरावा, इवानचा पुरुषी तिरस्कार, जुलियाची समर्पणाची स्त्रीसुलभ भावना, इवानचे परिवर्तन आणि त्यांचा क्षणिक मिलाप या साऱ्यांचे मनोहारी चित्रण या चित्रपटात घडवले आहे. चित्रपटाच्या सुरवातीची इयानची आणि शिकारी कुत्र्यांची झुंज प्रेक्षकांना बैठकीची मांडी बदलायला लावते.

इवान आणि जुलियाच्या मीलनाचे चित्रण अत्यंत कलात्मक रीतीने केले आहे. जुलियाचे स्नानदृश्य दाखवताना घण्यांच्या घणघणाटाचा आडपडदा इतका कुशलतेने वापरला आहे की [illegible] रूम्यांनत्सेवा आणि स्टानिस्लाव ल्युबशिन या दोघांनी जुलिया आणि इयानच्या भूमिका विलक्षण प्रत्ययकारी करून सोडल्या आहेत. बोरिस स्तेपानोव यांनी फ्लॅश-बॅक पद्धतीने ही चित्रकथा सांगितली आहे. संथ सुरुवात आणि तसाच संथ शेवट, परंतु मधला कथेचा ताण जबरदस्त आहे.

मुंबईत सोविएत चित्रपट महोत्सव नुकताच पार पडला, त्यातल्या दोन वेचक चित्रांचा हा थोडक्यात आढावा. याशिवाय पोलंडमध्ये लेनिन ' हे चित्र उल्लेखनीय होते. अजिबात संवाद न वापरता लेनिन यांचे विचार निवेदनाद्वारे सांगण्याचा अभिनव प्रयोग या चित्रात केला आहे. ' अलिनेन-माल-अलन ' हे अझरबैजानी चित्र आपल्या नाच गाण्यांच्या हलक्या-फुलक्या हिंदी सिनेमाची आठवण करून देणारे होते.

## □ नृत्याचा कैफ

आशा पारिखला या जगात भीति एकाच गोष्टीची, ती म्हणजे डॉक्टर व इंजेक्शनची. डॉक्टरचे नुसते नाव काढले की, अजून तिच्या अंगावर काटा उभा राहतो. तिच्या आई-वडिलांची इच्छा तिने डॉक्टर व्हावे अशीच होती. परंतु चौथ्या वर्षापासून आशा पारिखला नृत्याचे वेड लागले, आणि आता तर नृत्य हेच तिचे सारसर्वस्व होऊन बसले आहे. नृत्याचा एक वेगळा कैफ तिला चढतो. 'गरबा' करत असतांना सारा गुजरात तिच्यापुढे उभा राहतो. प्रथम तिने जाहीर नृत्य केले ते अलाहाबादमध्ये त्यातूनच तिच्या 'चौलादेवी' या 'नृत्य नाट्य' प्रकाराचा जन्म झाला.

आशा पारेख प्रथम पडद्यावर आली ती 'दिल देके देखो' मधून आणि थोड्याच काळात तिचा 'ग्लॅमर गर्ल' म्हणून गवगवा झाला. तिचे सारे वैशिष्ट्य आहे. तिच्या पदन्यासात आणि प्रसन्न कळ्या फुलाव्यात तशा आवाजात.

[ पृष्ठ ७ वरून ]

"आतां कसा बाईंना वेळ झाला ? आम्ही आता येणार नाही. अपमान करून घ्यायला आम्ही काय राज्याचे मुख्यमंत्री आहोत ? आम्ही स्वतंत्र नागालँडचे, अंडरग्राऊंड नागांचे–प्रतिनिधी आहोत. आतां आम्ही परत जातो...सगळं फिझोला कळवतो ! "–आणि गेले तणतणत निघून ! निष्ठुर कुठले ! !

असा सगळा विचका झाला. आतां इंदिराजी तरी किती ठिकाणी पाहणार हो ! काहीतरी करायला आता हवंच आहे. टीकाकार म्हणतात– "The Naga movement is a rebel movement. Since Nagas cannot be talked into ending it, it can be ended only through military action. The basic question is whether the Indian Union is worth preserving. If it is worth preserving, the price must be paid."

टीकाकारांना सांगायला काय होते. म्हणे हे बंड आहे, जर वाटाघाटी अशक्यच झाल्या तर ते चिरडले पाहिजे. बंड चिरडायचे म्हणजे लष्करी कारवाई आली म्हणतात, जर संघराज्य टिकवायचे असेल तर ही किंमत दिली पाहिजे. पण लष्करी कारवाई म्हणजे हिंसा आली. हिंसादेखील करायला हरकत नाही. बिहारमधल्या हिंदूंनी गडबड केली तर मागे पंडितजीदेखील त्यांच्यावर बॉम्ब टाकणार होते. पण हे फुटीर नागा लोक धर्माने ख्रिश्चन झाले आहेत. त्यांना हो कसे चिरडायचे. पोप रागावेल. शिवाय स्वतंत्र नागालँडला पाकिस्तान व चीनची मदत व फूस आहे म्हणे. म्हणजे कदाचित युद्धदेखील पेटायचे !

यात काही अर्थ नाही. तूर्त इतर उपाय चालू आहेत. एकजात अहिंसक उपाय. पोस्ट खात्याने स्टँप काढलाय. नेहरूंनी नागा लोकांचा पोषाख केलेला आहे आणि त्यांच्या मागून नागा येत आहेत असा हा स्टँप पहिलाच असेल तुम्ही. या स्टँपप्रमाणे आपण भारत सरकारला चिकटून राहिले पाहिजे अशी सदिच्छा नागांच्या मनांत यामुळे नक्की निर्माण होईल. शिवाय आसामची पुनर्रचना केली की भुट्टोने सगळा आसाम घेतला तरी नागालँड त्याला नाहीच मिळणार. छान जिरेल गुलामाची.

इंदिराजींनी अशा धूर्त धोरणाने, आपल्या देशाच्या राजकीय जीवनावर चांगलाच 'स्टॅम्प' उठवला आहे–हे मला निर्विवाद.

## □ दीर्घ द्वेष्टे

हेन्रिच म्युलेर हा हिटलरचा गुप्त पोलिस खात्याचा प्रमुख. फ्युररने आत्मघात केला त्या दिवशी हा त्या बंकरमध्ये होता. पुढे हा मारला गेला किंवा त्याने आत्महत्या केली असावी कारण बर्लिन येथील एका कबरस्तानात त्याचे थडगे देखील आहे.

म्युलेरची बायको फ्राऊ सोफी म्युलेर ही म्युनिचच्या उपनगरात राहते. एका वृत्तपत्र विक्रेत्याच्या दुकानात, विक्री करण्यासाठी तिला कुणीतरी नेमलेली आहे.

आटा म्हातारी स्थुल झालेली सोफी, नुकतीच आजारी पडून रुग्णालयात गेलेली असताना दोन इस्रायली तरुण तिच्या निवासात शिरले. त्यांच्या बरोबर कॅमेरे होते, संदेशवाहक यंत्रे होती. सोफी परत आली की ती काय करते. तिच्याशी व तिच्या मुलींशी कुणी अज्ञात माणूस अजून संबंध ठेवून आहे का, याचा सुगावा काढण्यासाठी हे दोघे आले होते.

कारण म्युलेर अजून जिवंत आहे – इजिप्तमध्ये तो नासरच्या देशात लपून राहिलेला आहे, असा संशय ज्यू लोकांना आलेला आहे. म्युलेर अल्बानियात व बल्गेरियातही दिसला होता अशी वदंता आहे. म्युलेर हा आईशमन्चा वरिष्ठ अधिकारी. या दीर्घद्वेष्टचा ज्यू लोकांनी अर्जेंटाईनमधून लपलेल्या आईशमन्ला शोधून काढला आणि खटला भरून–फाशी दिला. आता ते म्युलेरच्या शोधात आहेत.

काय हा दीर्घद्वेष. आम्ही म्हणतो असला म्युलेर जिवंत, त्याला शोधून काढण्यासाठी चोरून त्याच्या बायकोच्या घरात घुसणे चांगले का ? मारली असतील त्यांनी ज्यू माणसे. झाले गेले सिंधूला मिळाले. सगळे विसरून नको जायला ? हे द्वेषाचे चक्र काय असेच चालू ठेवायचे ? मूर्ख कुठले !

इस्त्रायलने भारताकडून खूपच काही शिकण्यासारखं आहे. हिंदूना नागवून, त्यांची अब्रू लुटून – असंख्य हत्या केलेले नराधम, भारताच्या सरहद्दीबाहेर सुखाने नांदत आहेत. त्यांना शासन करण्यासाठी धडपडणाऱ्या संस्था आमचेकडे नाहीत बुवा ! उलट त्यांच्या सुखासाठी, सौख्यासाठी आम्ही सतत त्याग करीत असतो. त्यांना आमची मुळीच भीती वाटत नाही. आमचे सरकार तर त्यांच्यावर प्रेमाचा सतत वर्षाव करते. आमचे हद्दीत त्यांना धरणेदेखील बांधून देते. पाण्याला काय जात कळते ? पाणी म्हणजे समता ! परंतु सूडाचे हे चक्र सतत फिरते ठेवणाऱ्या या ज्यूंना म्हणावे तरी काय ? म्युलेर म्हणून अमेरिकेत पनामा शहरात एका माणसाला अटकदेखील झाली आहे. तोच म्युलेर आहे असे जर्मन लोक म्हणतात. तोच म्युलेर ठरला तर बिचाऱ्याला हे ज्यू आता फाशी देतील ! आपल्या वंशाची हत्या करणाऱ्या नराधमांना वेचून वेचून ठार मारणाऱ्या या ज्यू मंडळींना दुसरा चांगला सूतकताई वगैरे उद्योग नाही का ? आपल्या देशांतील लोकांमध्ये हा जो अधूनमधून द्वेषाचा उद्रेग होतो याची कारणे शोधून काढण्यासाठी इस्राइलचे गृहमंत्री एखादे कमिशन का बुवा नेमीत नाहीत... Commission to inquire into the causes at anti-German activities of youths in the country– याच द्वेष निर्मितीवर उपाय सुचवायला सांगितले की काम झाले. अशा कमिशनवर काम करायला एखादा जर्मन द्वेषविरहित, बुळबुळीत माणूस, सत्रंघ ज्य देशात त्यांच्या पंतप्रधानांना मिळत नसेल तर त्यांनी भारताकडे अवश्य मदत मागावा. इथे निदान अशी माणसे तरी विपुल आहेत. वाटल्यात भारतातील जातीय वैमनस्याची चौकशी करण्याकरिता नेमलेले कमिशनच इथले काम आटोपल्यावर तिकडे येऊ शकेल. ○

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

दि. १६ ते २२ डिसेंबरचे भविष्य

**मेष** : सूर्य भाग्यस्थानी आणि मंगळही अधिकाधिक अनुकूल, इतकी चांगली ग्रहस्थिती लाभलेली असताना वास्तविक तुमचे कुठेही नडू नये. पण साडेसातीच्या चक्रव्यूहातून तुम्हांस जावे लागते त्यामुळे थोडेफार खटकायचेच. यामुळेच या वेळी कोणतीही गोष्ट सिद्धीस नेण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल. अपेक्षाभंग होणार नाही. अपयशाचा डागही लागणार नाही पण त्यासाठी अविश्रांत परिश्रमाचे मोल द्यावे लागेल.

या काली क्षणाची उसंत मिळणार नाही. व्यावसायिक दौरे काढावे लागतील, राष्ट्रीय कार्यक्रमांची आखणी करावी लागेल, सभासंमेलने यशस्वी करून दाखविण्यासाठी धावपळ–धडपड खूपच करावी लागेल. पण हे सारे परिश्रम कारणी लागतील. हेतू सिद्धीस जातील.

दि. १६ ते १९ या काली अनेक जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील.

**वृषभ** : इच्छा असूनही आणि प्रयत्न करूनही आजवर अपेक्षेप्रमाणे काही घडू शकले नाही. आता त्या तुमच्या साऱ्या असफल आकांक्षा पूर्णत्वाने सफल करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत असे गुरु–मंगळांचे आपणांस आवर्जून सांगणे आहे.

भाग्यातील मंगळ तुमचे प्रगतीचे न सुटणारे गणित सोडवून देईल आणि सूर्य–गुरू त्रिकोण तुमच्या भंगलेल्या अपेक्षा व्यवस्थितपणे सांधून देईल.

बदली–बढती स्थानांतर हेच आठवड्यातील ग्रहस्थितीचे मुख्य कार्य. आता रेंगाळणे नाही, की माघारही नाही. "पुढे चला" हा एकच मंत्र तुम्ही पठण करीत राहाल.

दि. १९ ते २१ या काळी अनेक चांगल्या गोष्टी घडून याव्यात.

**मिथुन** : आठवा मंगळ आणि सातवा सूर्य अशा ग्रहस्थितीत झटपट आणि सहज-सुलभपणे काही घडेल ही आशाच खोटी. पण हाती घेतलेली कामे यशस्वी

करण्यासाठी केलेली धावपळ, धडपड वाया जाईल असं मात्र घडणार नाही. आगामी काली घडून येणारा सूर्य-गुरू त्रिकोण ज्या अनन्यसाधारण प्रगतीच्या घटना घडवून आणणार आहे. त्या अंकुरायला लागतील या आठवड्यातच.

अविश्रांत परिश्रमामुळे प्रकृतीवर खूपच ताण पडेल, वाढत्या खर्चामुळे मन विषण्ण-उद्विग्न बनेल. याचना वंचना करण्याचाही प्रसंग काही वेळा ओढवेल. दूरच्या प्रवासाचे टाळा आणि मंगलकार्याचे थोडे पुढे ढकला.

दि. २० ते २२ एवढाच काल काहीसा अनुकूल.

**कर्क** : सूर्य षष्ठस्थानी आल्याने, सातव्या मंगळाच्या स्वैर वर्तनाला निश्चितच आळा बसेल. आणि त्यामुळेच व्यवसायक्षेत्रातील संघर्ष मिटण्याची शक्यता दिसू लागेल. कौटुंबिक वातावरणातील हरवलेले स्वास्थ्य गवसेल.

सामाजिक कार्यक्रमातून शक्यतो अंग काढून घेतलेले बरे. निष्कारण खोटेनाटे आरोप येऊ लागतील, बारीक सारीक गोष्टींत मतभेद निर्माण होतील. गुरु-शनीचे सामर्थ्य पाठीशी उभे असल्याने तसे काही विशेष अनिष्ट घडेल याची भीती बाळगण्याचे कारण नसले तरी या वेळी काहीसे जपून वागणे चांगले.

न पेलवणाऱ्या जबाबदाऱ्या स्वीकारताना दहा वेळा विचार करा आणि राजकीय क्षेत्रांत भाग घेतांना थोरांचा सल्ला घ्या.

दि. १५-१७-२१-२२ थोडेफार अनुकूल दिवस एवढेच.

**सिंह** : सूर्य धनू राशीत आला आणि तुम्हांला प्रकाश दिसू लागला. आजवर चौथ्या सूर्याने अपेक्षेप्रमाणे फारसे घडू शकले नाही.

आजवरच्या व्यथा-विवंचना मिटू लागतील, व्यापारधंद्यातील घसरण रोखली जाईल, नोकरीतील कटुता मिटून सर्वत्र प्रसन्न-उत्साही वातावरण दिसू लागेल.

हितशत्रूंना ठोकरून काढायला आता कचरणार नाही. नवे स्नेहसंबंध याच वेळी अधिकाधिक अनुकूल आहेत. गेल्या वर्षभरात जे काही घडू शकले नाही ते या वेळी सहजासहजी घडून यावे. दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल, क्रीडाक्षेत्रात विक्रम करून दाखवण्याची संधी लाभेल.


रेडिओ सेल्स व सर्व्हिस

● वाजवी दर

● मनपसंत काम

**रेडिओ फोटो हाऊस,**

२७७ शुक्रवार पेठ, शाहू चौक, पुणे २

दि. १७–१९ अपेक्षासाफल्याचा काल.

**कन्या :** या वेळच्या मकरेच्या सर्वोच्च मंगळापासून तुमच्या अपेक्षा फार मोठ्या आहेत आणि त्या बऱ्याच प्रमाणात सफल करण्यास तो कटिबद्ध आहे.

या वेळचे तुमचे अनपेक्षित लाभाचे आणि व्यावसायिक प्रगतीचे त्रैराशिक मुळीच चुकू नये. आपले बरेच दिवसांचे ध्येय धोरण हिरीरीने अंमलात आणले जाईल. चौथ्या सूर्याची आणि बाराव्या गुरूबद्दल मुळीच खंत बाळगू नका बुध-शुक्र तुमची नौका यशस्वीपणे पैलतिराला नेऊ शकतील.

शिक्षणात प्रतिष्ठा लाभेल, व्यवसायधंद्याचे बदललेले तंत्र जगाला मार्गदर्शक ठरेल. हाती पैसाही मोठ्या प्रमाणावर यायला लागेल.

दि. १८ ते २० या कालावरच सारे लक्ष केंद्रित करा.

**तूळ :** चौथ्या मंगळाची आता आपणांस दखल घेण्याची गरज नाही. सूर्य पराक्रमात आणि गुरु एकादशात या वेळी हेच तुमचे भाग्यविधाते.

कला, साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना तर इतका सर्वांगाने प्रगतीचा काल यापूर्वी क्वचितच अनुभवण्यास मिळाला असेल.

हे दिवस खूपच धाईगर्दीचे, धावपळीचे जाणवतील. दूरच्या प्रवासाचे ठरेल. नव्या व्यवसायक्षेत्राचा आराखडा आखला जाईल, कौटुंबिक मंगलकार्याबद्दल निश्चित निर्णय घेतला जाईल. पैसा अफाट खर्च होईल–पण हाती पैसाही खूपच येईल. कल्पनेत असलेल्या भव्य योजना आकार घेऊ लागतील. मुख्यत: क्रीडाक्षेत्रातील जवानांना या काली नेत्रदीपक यश लाभेल.

दि. २० ते २२ या काली अनेक लाभ उठवू शकाल.

**वृश्चिक :** मंगळ पराक्रमस्थानी असेपर्यंत अन्य कोणत्याही ग्रहाकडे अपेक्षेने पाहण्याची गरजच नाही. तुमचे भवितव्य घडविणार आहे एकटा मंगळ.

या वेळी पैसा आणि प्रतिष्ठा अमाप मिळेल. कार्याचा व्याप आणि विस्तार इतका वाढेल की, महान उद्योगपतींच्या यादीत तुमचे नाव दिसू लागेल.

सहज काही करावे आणि ते धवधवीत यश घेऊन उठावे याचा प्रत्यय याच वेळी यावा.

स्थावराची वाहनाची समस्या सुटेल, प्रगतीच्या मार्गातील अनक टप्पे ओलांडून पुढे जाल, राजकीय क्षेत्रात तर तुमच्याविना पान हलेनासे होईल. आजतरी निदान आघाडीवर दिसू लागतील फक्त वृश्चिकराशीचे लोकच.

दि. १९ ते २२ या काली अनेक महत्त्वाची कामे यशस्वी होतील.

**धनू :** सूर्याचे धनुराशीतील राश्यंतर तुम्हाला वरदान ठरेल. लवकरच अंतरिक्षात घडून येणारा अलौकिक सामर्थ्याचा ग्रहयोग सूर्य-गुरुत्रिकोण तुमच्या जीवनात काही भव्यदिव्य करून जाईल. त्याची प्रसादचिन्हे या आठवड्यापासूनच दिसायला लागतील. भाग्यस्थ गुरु आपली सारी शक्ति आणि बुद्धि पणास लावून तुमचे जीवन

कृतार्थ करण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करीत राहील.

दूरच्या प्रवासाचे–कदाचित् परदेशगमनासाठीही प्रस्थान ठेवले जाईल. तुमच्या अंगच्या सुप्त कर्तृत्वाला चालना मिळू लागेल. अनेक योजना या वेळी यशस्वी करून दाखविल्या जातील.

दि. १७–१८–२१–२२ या काली अनंत अपेक्षा सफल व्हाव्यात.

**मकर :** सध्या सूर्य-मंगळ तुमच्यावर नाराज दिसतात. त्यांच्याकडून फारशी अपेक्षा करण्यात अर्थ नाही. जे थोडे फार यश तुमच्या पदरी पडेल ते केवळ तुमच्या निर्धारनिष्ठेमुळेच.

प्रकृती-मनस्थितीवर थोडा ताण पडेल. परिश्रम फारच करावेत तेव्हा थोडेफार यश पदरी पडावे असा सतत अनुभव येत राहील. पण अपयश आणि अप्रतिष्ठा असे काहीच घडणार नाही. खर्चाचा लोंढा थोपविण्यात फारसे यशस्वी व्हाल असे दिसत नाही. या वेळी मुख्यतः आपल्या प्रकृतीची, आपण विशेष काळजी घ्यायला हवी. वाटेल तसे वागून वाटेल तिथे जाऊन भागण्यासारखे नाही. थोडेसे जुळते मिळते घेण्याची सवय ठेवा.

दि. १८ ते २० हे दिवस काहीसे अनुकूल अनुभवण्यास मिळतील.

**कुंभ :** सूर्य एकादशस्थानी आल्याने बाराव्या मंगळाच्या अनिष्टतेला निश्चितच शह बसेल. आगामी सूर्य-गुरू त्रिकोणावर आपण आपले सारे लक्ष केंद्रित करा. त्या काली घडून येणाऱ्या अनंत लाभदायक घटना या आठवड्यातच अंकुरायला लागतील.

आरोग्य सुधारेल, प्राप्ती वाढू लागेल, नोकरीत अनपेक्षित प्रगतीची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागतील.

तुमच्या जीवनातील चिरंतन स्तृतीच्या घटना या काली घडून येतील.

ग्रंथप्रकाशन संशोधन कार्य, यांत्रिक व्यवसाय यांना याच काली विशेष गती मिळायला लागेल. प्रिय जनांच्या भेटीगाठीने मन प्रसन्न बनेल.

दि. १८–२०–२२ या वेळी आपले सारे प्रयत्न यशस्वी ठरावेत.

**मीन :** या वेळी अंतरिक्षातील बरेचसे ग्रह तुमच्यावर खूष आहेत.

या काली तरी आपली साडेसाती विसरू शकता. नोकरीधंद्यात मुख्यतः कला-साहित्याच्या क्षेत्रात या वेळी अनपेक्षितपणे प्रचंड लाभ घडून येतील. या वेळी तुमच्या प्रगतीला उधाण येईल.


आजवरची आपली तपश्चर्या या कालापासून फळाला यायला लगेल. साडेसातीमुळे फार मोठी प्रतिष्ठा जरी लाभली नाही तरी आपले परिश्रम वाया जातील असे काही घडणार नाही.

नोकरीधंद्यात बदल घडून येण्याची लक्षणे दिसायला लागतील.

दि. १९ ते २२ या वेळी प्रगतीला वाव मिळू लागेल.

○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649




चवथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

ब. मा. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशन,

उंबऱ्या गणपती चौक, लक्ष्मी रोड,

४१९ नारायण पेठ, पुणे २.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**